cmyk

## संपादकीय

### न्यायपालिकेच्या पारदर्शकतेमध्ये साशंकता नसावी

पारदर्शकतेच्या हल्लीच्या जमान्यात प्रत्येक बाब बहुतांश खुली झाली असल्यामुळे कोणता मेंदू कोणत्या दिशेने काम करेल याची शाश्वती देता येत नाही. कर्नाटक न्यायालयातील एका प्रकरणात असाच प्रकार घडला व त्याला गंभीर वळण लागले. अर्थात, कोणी कसेही वळण देण्याचा प्रयत्न केला तरी मूळ विषयच किंवा मूळ व्यक्त केलेले मतच गंभीर होते आणि सर्वथा अनावश्यक होते.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### मुडा घोटाळा प्रकरणात कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांवर गुन्हा दाखल

बंगळूरूः म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी (मुडा) साइट वाटप घोटाळा प्रकरणात कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या विरोधात शुक्रवारी (दि.२७ सप्टेंबर) एफआयआर नोंदवला गेला आहे. लोकायुक्त पोलिसांनी ही कारवाई केल्याचे समोर आले आहे.

म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी (मुडा) कडून जमीन वाटपाशी संबंधित कथित घोटाळ्याप्रकरणी राज्य भ्रष्टाचारविरोधी संस्थेने शुक्रवारी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. हे पाऊल, जे काँग्रेस नेत्यासाठी एक मोठे कायदेशीर आव्हान असू शकते. त्यांच्या पत्नीला नियमांचे उल्लंघन करून मुडा द्वारे प्रीमियम मालमत्ता वाटप केल्याच्या आरोपांची चौकशी करण्याचे निर्देश देणाऱ्या न्यायालयाच्या आदेशानंतर लोकायुक्त पोलिसांची ही मोठी कारवाई आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१५७ | शनिवार दि.२८ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा अहवाल न दिल्याने निवडणूक आयोगाकडून शासनाची खरडपट्टी

मुंबई । प्रतिनिधी

**तब्बल तीनवेळा स्मरणपत्र देऊनही राज्यातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत निर्णय न घेतल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य शासनाची खरडपट्टी काढली आहे. याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांनाही पत्र लिहून जाहीर नाराजी व्यक्त केली आहे.**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत केलेल्या सूचनांचा अहवाल न दिल्याने आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली. एकाच जागी तीन वर्षांपेक्षा जास्त काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या सूचना आयोगाने एका पत्रा द्वारे शासनाला दिल्या होत्या. पण या पत्राकडे दुर्लक्ष केल्याने आयोगाने नाराजी व्यक्त केली आङे. दिलेल्या कालावधीत या सगळ्यांची माहिती का दिली नाही, हे स्पष्ट करण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले आहेत. तीन वेळा स्मरणपत्र पाठवूनही राज्य सरकारकडून कुठलेही उत्तर न आल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाने ताशेरे ओढले आहेत.

# दुधाच्या अनुदानातील वाढ बिनकामाची !

## अनुदान वाढीचा फायदा शेतकऱ्यांऐवजी दूध संघांनाच अधिक



पुणे । प्रतिनिधी

**राज्य सरकारने दुधाला ७ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु या निर्णयाचा फायदा दूध उत्पादकांऐवजी दूध संघांना होणार आहे. कारण या निर्णयानुसार दूध संघांनी पूर्वीच्या ३० ऐवजी २८ रुपये प्रतिलिटर दूध दर देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी राज्य सरकारने ८७९ कोटी रुपये निधीला मंजूर दिली आहे. या संदर्भात राज्य सरकारने गुरुवारी (दि.२६) शासननिर्णय प्रसिद्ध केला आहे. दूध अनुदानातील वाढ शेतकऱ्यांऐवजी दूध संघांसाठी केली जात असल्याचे बोलले जात आहे. म्हणजेच राज्य सरकारचे खायचे दात आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, अशी टिका दूध उत्पादकांकडून केली जात आहे.**

राज्य सरकारच्या २ जुलैच्या शासननिर्णयानुसार सहकारी आणि खासगी दूध संघांनी दूध उत्पादकांना ३० रुपये प्रतिलिटर ◀◀ पान २ वर

### शेतकरी अनुदानापासून वंचितच...

दूध दरातून उत्पादन खर्च वसूल होत नसल्याने शेतकऱ्यांनी आंदोलन पुकारले होते. त्यानंतर राज्य सरकारने हिवाळी अधिवेशनात दोन महिन्यांसाठी दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपये अनुदान देण्याची योजना राबवण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्यामध्ये अटी आणि शर्थीची पाचर मारली. त्यामुळे दूध उत्पादक या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले. पुढे या योजनेला मुदत वाढ देण्यात आली. त्यानंतर अतिरिक्त अर्थसंकल्पात अर्थमंत्री अजित पवारांनी ५ रुपये अनुदान योजना कायम ठेवण्याची घोषणा केली होती. परंतु बहुतांश शेतकरी अद्यापही दूध अनुदानापासून वंचित राहिले आहेत.

## केज तालुक्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार

केज । प्रतिनिधी

केज येथील वसतिगृहातील एका मुलीवर अत्याचार केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. ती अल्पवयीन पीडित मुलगी एक महिन्याची गरोदर असल्याचेही सांगण्यात येत आहे. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात सन्नी उर्फ स्वप्नील पाडळे आणि त्याचा मित्र अमोल जाधव याच्या विरुद्ध बाल लैंगिक अत्याचार अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील पीडित मुलगी आजोळी राहते. शनिवारी (दि.२१) वसतीगृहाला सुट्टी असल्यामुळे ती आजोळी आईकडे गेली होती. त्यानंतर दि. २४ सप्टेंबर रोजी आईने तिला सकाळी १० वाजता वसतीगृहामध्ये सोडले. त्याच दिवशी आजोळी तिच्या शेजारी राहणारा आणि ओळखीचा असलेल्या सनी पाडळे व त्याच मित्र अमोल जाधव यांनी वसतीगृहामध्ये जाऊन पीडितेला बाहेर बोलावून घेतले. तुझ्या मामाने तुला सरकारी दवाखाना केज येथे बोलवले असल्याचे तिला सांगितले. त्यानंतर तिला मोटारसायकलवर बसवून केज येथील अंबाजोगाई रोडवरील ◀◀ पान २ वर

## कर्मचारी लाच घेताना चर्तुभूज

बीड–येथील उपविभागीय कार्यालयातील तलाठ्याने कारवाई न करण्यासाठी ७ हजाराची लाच मागितली. त्यास लाचेची रक्कम घेताना संभाजी नगर एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडण्याची कारवाई शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात केली. लाचेतील ५ हजार रुपये हे उपविभागीय अधिकाऱ्यांसाठी घेतल्याचे समजते. निलेश धर्मदास मेश्राम (तलाठी, मांजरसुंबा) प्रतिनियुक्ती उविभागीय अधिकारी कार्यालय, बीड असे लाचखोर कर्मचाऱ्याचे नाव असून बीड येथील कौटुंबिक न्यायालय, जुनी इमारत उपविभागीय अधिकारी कार्यालयात असताना तक्रारदार याचे गेवराई हद्दीतील एका हॉटेलवर दारुबंदी विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. यात दोन गुन्हे दाखल होते. त्या अनुषंगाने नोटीस आल्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करु नये म्हणून स्वत:साठी २ हजार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांसाठी ५ हजार असे ७ हजाराची मागणी केली. त्यानंतर ही रक्कम पंचसमक्ष स्विकारताना तलाठ्यास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात संभाजीनगर एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले. मेश्राम यास ताब्यात घेतले असून बीड शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# बजरंग सोनवणे यांची खासदारकी धोक्यात ?

## अमर नाईकवाडे, ॲड. नारायण सिरसाट यांच्याकडून उच्च न्यायालयात याचिका दाखल; प्रतिवाद्यांना बजावल्या नोटीस

संभाजीनगर । प्रतिनिधी

**बीड लोकसभा मतदारसंघात धुरळा उडवून देणारे आणि पंकजा मुंडे यांचा पराभव करणारे बजरंग सोनवणे यांची खासदारकी रद्द करण्यासाठी हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. ही याचिका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी नगरसेवक अमर नाईकवाडे आणि ॲड. नारायण सिरसाट यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात खासदारकीला आव्हान देणारी याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी झाली असून खा. सोनवणे यांच्यासह इतर प्रतिवाद्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. आता यात निकाल काय लागतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

बीड लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले उमेदवार बजरंग सोनवणे यांनी भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांचा लोकसभेत ६५५३ मतांनी पराभव केला होता. बजरंग सोनवणे यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेली होती. प्रतिवादी बजरंग सोनवणे यांना निवडून आल्याचे जाहीर केलेला निर्णय रद्द करावा अशी मागणी याचिकेतून करण्यात आलेली आहे. दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे की काही मतदान केंद्रावरील मतांवर आक्षेप घेण्यात आलेला आहे.









याचिकाकर्ते

आदी मुद्द्यावर खंडपीठाने याचिका दाखल करून घेतलेली आहे. शुक्रवारी या याचिकेवर न्या. ए. एस. वाघवसे यांच्या समोर सुनावणी झाली. यावेळी खा. बजरंग सोनवणे यांच्यासह सर्वच प्रतिवाद्यांना चार आठवड्यात कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे. तर याचीकाकर्त्यांच्या वतीने ॲड शशिकांत ई. शेकडे यांनी बाजू मांडली. त्यांना ॲड. पृथ्वीराज ए. ढाकणे, ॲड. बी. एस. बोडखे, ॲड. विशाल थावरे, ॲड. आर.जी. नरवडे व एन. एस. राठोड यांनी सहकार्य केले. पुढील सुनावणी २४ ऑक्टोंबर रोजी असून या निकालाकडे संपूर्ण ◀◀ पान २ वर

### *२४ आक्टोंबरला सुनावणी*

*दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी झाली असून पुढील सुनावणी ही २४ ऑक्टोंबर रोजी होणार असून याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.*

### *याचिकेतील आक्षेप काय?*

*पोलिंग बूथ केंद्रांची संख्या वाढवताना राजपत्रानुसार प्रसिद्ध करणे गरजेचे असताना सुद्धा निवडणुकीच्या ऐन तीन दिवस अगोदर पोलिंग बुथ केंद्र वाढवलेले आहे. त्यामुळे ४२६१ लोक मतदानापासून वंचित राहिलेले आहेत. ते बुथ कायद्याच्या दृष्टीने बेकायदेशीर आहेत तसेच सदरील पोलिंग बुथचे मतदान हे मतमोजणी करताना मोजता येणार नाही. ते मतदान हे अवैध असून त्याच्यावर आक्षेप घेण्यात आलेला आहे. माजलगाव शहरांमधील बूथ क्रमांक ६८ केंद्रावरील ईव्हीएम मशीनमधील घोळामुळे ७७४ मतदान हे मोजण्यात आलेले नाही. व वैध असणारे ११५६ पोस्टल मतदान हे बेकायदेशीरपणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बाद केलेले आहेत. तसेच निवडणूक निर्णय घोषित करताना ९०९ मतांचा फरक आढळून येत आहे. हे सर्व सर्व मतदान निवडणुकीच्या निकालावर परिणामकारक ठरणारे आहे. तसेच प्रतिवादी बजरंग सोनवणे नामनिर्देशन फॉर्म भरताना शपथपत्रात खोटी माहिती पुरवलेली आहे.*

### *झालेले मतदान आणि मोजलेले मतदान यात फरक*

*बीडमध्ये मतदानाच्या दोन दिवस अगोदर बूथ क्रमांक ८६ ए, १३० ए, १३९ ए,१४० ए, १७० ए, १९० ए, १२ ए असे एकूण ७ बूथ अचानक वाढविण्यात आले. त्यामुळे ४२६१ मतदारांना मतदान करता आले नाही. तमाजलगाव मधील बूथ क्रमांक ६८ वरील ७७४ मतदान मोजण्यात आलेले नाही. याशिवाय वैध असलेले पोस्टल मतदानात एकूण ११५६ मतदान बाद करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने एकूण झालेले मतदान आणि प्रत्यक्ष मोजले गेलेले मतदान यांच्यात जवळपास ९०९ मतांचा फरक असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.*

### चार महिन्यानंतर याचिका दाखल करून काय उपयोग?

लोकसभेचा निकाल लागून जवळपास चार महिने लोटलेले आहेत. निकाल लागल्यानंतर या गोष्टीची बरीच चर्चा झाली, खऱ्या अर्थाने त्याच वेळी पंकजा मुंडे यांनी याचिका दाखल करणे अपेक्षित होते. मात्र याचिका दाखल करण्यासाठी त्यांच्या समर्थकांनी तब्बल चार महिन्याचा कालावधी लावला, याबद्दल मात्र आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## मराठा आंदोलनाचा शरद पवार पहिला राजकीय बळी ठरतील

### प्रकाश आंबेडकरांच्या विधानाने खळबळ; मराठा नेता म्हणून शिक्कामोर्तब

मुंबई । प्रतिनिधी

शरद पवार हे केवळ मराठा नेते झाले आहेत, अशी स्थिती मराठा आंदोलनामुळे निर्माण झाली आहे. आजपर्यंत ते मराठा आरक्षणाबाबत जरांगे यांची मागणी टाळत आले. मात्र, रत्नागिरीच्या सभेत त्यांनी जरांगे यांच्या मागणीला पाठिंबा दर्शवला. यामुळे जरांगे यांच्या





मराठा आंदोलनाचा शरद पवार हे पहिला राजकीय बळी ठरतील असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये उमेदवार उभे केले नाही, तर ते शरद पवारांच्या इशाऱ्यावर चालत ◀◀ पान २ वर

### ओबीसीतून कधीच आरक्षण मिळणार नाही

ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण कधीच मिळणार नाही. कारण यापूर्वी दोनवेळा हे आरक्षण कोर्टाने फेटाळले आहे. एसटी प्रवर्गातून धनगर आरक्षण मिळण्याबाबत प्रकाश आंबेडकर म्हणाले की, न्यायालयानेच धनगर आणि धनगड हे दोन्ही समाज वेगवेगळे असल्याचे स्पष्ट केल्याने या मागणीत आता अर्थ उरला नाही, असेही आंबेडकर म्हणाले.

## गेवराईतून मशाल चिन्हावर बदामराव पंडित हेच महाविकास आघाडीचे उमेदवार


### सुषमा अंधारेंनी केली घोषणा

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातला शिवसेनेचा नंबर एकचा प्रबळ असलेला विधानसभा मतदारसंघ म्हणजे गेवराई आणि याच गेवराईतून मशाल चिन्हावर बदामराव पंडित हेच महाविकास आघाडीचे उमेदवार असतील अशी थेट घोषणा शिवसेना उपनेते सुषमाताई अंधारे यांनी हजारो महिला ◀◀ पान २ वर



## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रोहिदास पाटील यांचे निधन



धुळे । प्रतिनिधी

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री रोहिदास पाटील यांचे शुक्रवारी (दि.२७) सकाळी ११ च्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता नेहरू हौसिंग सोसायटी, देवपूर, धुळे येथील निवासस्थानापासून निघेल. आणि एसएसव्हीपीएस कॉलेज ग्राउंडवर अंत्यसंस्कार करण्यात येतील. अंत्यदर्शन शनिवारी सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत नेहरू हौसिंग सोसायटी, देवपूर, धुळे येथील सुंदर सावित्री सभागृहात घेता येईल. त्यांच्या पश्चात ◀◀ पान २ वर

## देवेंद्र फडणवीसांच्या कार्यालयावर हल्ला करणाऱ्या महिलेची ओळख पटली

मुंबई । प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयावर शुक्रवारी (दि.२७) एका महिलेने हल्ला केला. त्यानंतर मंत्रालय परिसरात खळबळ उडाली होती. ही महिला देवेंद्र फडणवीसांच्या कार्यालयापर्यंत पोहोचल्याने सर्वांकडून आश्चर्य व्यक्त केले जात होते. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयावर हल्ला करणाऱ्या महिलेची ओळख पटली आहे.

देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रालयातील कार्यालयावर हल्ला करणाऱ्या महिलेची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले आहे. ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६.५० क्विंटल | २,४०० | २,६२४ | २,५१२ |
| ज्वारी/हायब्रिड :४९.०० क्विंटल | १,९७० | ३,००० | २,२४६ |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : १६२.०० क्विंटल | ५,८०१ | ७,५३६ | ६,९६६ |
| बाजरी : ३२.०० क्विंटल | १,८०० | २,८५१ | २,३६६ |
| मुग : २६.५० क्विंटल | ५,५०० | ७,३०१ | ६,८८४ |
| सोयाबीन: २२६.५० क्विंटल | ३,४१५ | ४,६५० | ४,०७७ |
| हरभरा: ४.५० क्विंटल | ५,९०१ | ८,०६० | ६,९८७ |

# महाराष्ट्र शासनातर्फे उद्या राज्यस्तरीय कृषी पुरस्कार सोहळा!

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनातर्फे सन २०२० ते २०२३ या वर्षीच्या ४४८ पुरस्कार्थींचा पुरस्कार वितरण व सत्कार समारंभाचा कार्यक्रम होणार आहे. ९ विभांगामध्ये कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, व्यक्ती, संस्था, गट, अधिकारी आणि कर्मचारी यांना हे कृषी सेवारत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. शेतीमधील उत्पादकता आणि उत्पन्न वाढीकरिता योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांना राज्य शासनाकडून पुरस्कार दिले जातात. हा कार्यक्रम महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते रविवार (दि.२९) ला नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया (डोम), वरळी मुंबई येथे हा कार्यक्रम होणार आहे.**

कृषी उत्पादन आणि उत्पादन वाढीमध्ये योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या बहुमोल कार्यासाठी गौरवित केले जाणार आहे. हे पुरस्कार राज्यातील कृषी विस्तारात विशेष योगदान देणाऱ्यांचा सन्मान म्हणून दिला जातो, ज्यामुळे नवनवीन कृषी तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार होण्यास मदत होते. या पुरस्कार समारंभाला राज्यभरातील शेतकरी, अधिकारी, कृषी क्षेत्रातील तज्ञ आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. याचा उद्देश शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणे, तसेच राज्यातील शेती क्षेत्रात सकारात्मक बदल घडवणे हा आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कशीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, ◀◀ पान २ वर




cmyk

## अग्रलेख

# न्यायपालिकेच्या पारदर्शकतेमध्ये साशंकता नसावी

पारदर्शकतेच्या हल्लीच्या जमान्यात प्रत्येक बाब बहुतांश खुली झाली असल्यामुळे कोणता मेंदू कोणत्या दिशेने काम करेल याची शाश्वती देता येत नाही. कर्नाटक न्यायालयातील एका प्रकरणात असाच प्रकार घडला व त्याला गंभीर वळण लागले. अर्थात, कोणी कसेही वळण देण्याचा प्रयत्न केला तरी मूळ विषयच किंवा मूळ व्यक्त केलेले मतच गंभीर होते आणि सर्वथा अनावश्यक होते. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाला त्याची दखल घ्यावी लागली आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्याच एका न्यायाधीशांना ताकीद द्यावी लागली. ताकीद केवळ एका विशिष्ट न्यायाधीशांना नव्हती, तर समाजातील प्रत्येक स्तरात कार्यरत असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ती होती. त्यामागचे गांभीर्य सगळ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे.

कर्नाटकातील एक घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील वाद होता. प्रकरण उच्च न्यायालयापर्यंत गेले. सुनावणीच्या वेळी न्यायाधीशांनी टिप्पणी करताना बंगळुरूच्या एका विशिष्ट भागाचा 'पाकिस्तान' असा उल्लेख केला. तसेच एका महिला वकिलाविषयीही आक्षेपार्ह मत नोंदवले. न्यायाधीशांना आपली चूक लक्षात आल्यावर त्यांनी माफीही मागितली. आपल्या समाजात महिलांविषयी जे पूर्वग्रह आहेत ते डोकावतातच हे त्यांच्या टिप्पणीवरून पुन्हा सिद्ध झाले. हे पूर्वग्रह अगदी ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत सगळीकडेच दिसून येतात. अगदी मोठे दिग्गज नेते एखाद्या महिला प्रतिनिधीने विचारलेल्या प्रश्नालाही महिलेने विचारलेला प्रश्न असाच अँगल देत त्याला त्याअनुरूप उत्तर देतात आणि बऱ्याचदा गंभीर प्रश्नही मग थट्टेवारी नेला जातो. आता अगदी अलीकडच्या काळात राज्यसभा सदस्या जया बच्चन यांच्या विषयीचा मुद्दा त्याबाबत पुरेसा बोलका आहे. 'मी एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे, मला माझी स्वत:ची ओळख आहे व ती मी निर्माण केली आहे', असे जया बच्चन यांचे म्हणणे होते. तथापि, सभागृहात त्यांच्या नावाचा पुकारा करताना त्यांचे पूर्ण नाव घेतले गेले. त्यांनी आक्षेप घेतला तरी पुन्हा तसेच केले गेले आणि ज्या गांभीर्याने जया बच्चन यांचे म्हणणे घेणे आवश्यक होते तसे ते घेतले नाही. कर्नाटक उच्च न्यायालयातही महिला वकिलाशी बोलताना शब्दांच्या सर्व मर्यादा ओलांडल्या गेल्या. दुसरी गोष्ट तेथे घडली ती शहरातील संबंधित भागाचा पाकिस्तान असा उल्लेख केला गेला. समाज माध्यमांवर हीच बाब मोठ्या प्रमाणात पसरवली गेली. आपल्या देशातील कोणत्याही भागाला असे पाकिस्तान संबोधणे प्रादेशिक अखंडतेच्या विरोधात आहे, असे सरन्यायाधीशांनी सांगितले. एखाद्या भागाला पाकिस्तान म्हणणे अथवा असे म्हणून डिवचणे हा प्रकार केवळ न्यायालयात घडला असे नाही तर दिवसात किमान अशी दहा उदाहरणे आपल्या ऐकण्यात, पाहण्यात आणि वाचनातही येतात.

पाकिस्तान, छोटा पाकिस्तान अशी विशेषणे सर्रास लावली जातात. केवळ भागांना तशी ओळख देण्यापुरते हे मर्यादित नाही. सार्वत्रिक मान्य केल्या गेलेल्या लोकप्रिय समाजाच्या पलीकडे जर कोणी कोणत्या विषयावर वेगळी भूमिका घेतली, तरी त्याला 'पाकिस्तानात जा' असे चटकन सांगितले जाण्याची प्रथाही आपल्याकडे रूढ आहे. याचा फटका भल्याभल्यांना बसला आहे. त्यात देशातील अनेक नामांकित मंडळींचा समावेश आहे. समाजातील कोणत्या उणिवेकडे कोणी बोट दाखवत असेल, तर खरे तर आपल्यात सुधारणा करण्यासाठी त्याने केलेली ती मदत आहे असे मानलेच जात नाही. उणीव दाखवली म्हणून तो आपला शत्रू होतो आणि शत्रूचे आडनाव आपल्याला त्याची जात आणि धर्म दाखवते. एकदा याचा उलगडा झाला की मग आपण त्याला देशाबाहेर जाण्याचा किंवा त्याची देशातून हकालपट्टीच केली जावी असा निवाडा एकतर्फी करून टाकतो. त्यात समाजमाध्यमांनी काम आणखी सोपे केले आहे. त्या माध्यमातून जेवढे आपल्यापर्यंत आले आहे व जेवढे आपल्याला झेपले आहे तेवढेच आपण पुढे प्रसृत करतो. त्यात मग आपल्याला आपल्यासारख्याच विचारधारेचे असंख्य अनुयायी मिळतात आणि बघता बघता हे सगळे प्रकरण हाताबाहेर निघून जाते. गंमत म्हणजे कोणत्या संदर्भात अथवा कोणत्या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने समोरच्या व्यक्तीने आपले मत नोंदवले आहे याची पडताळणी करण्याच्या भानगडीत आपण पडत नाही. आपण आपल्यासमोर आलेली अर्धीमुर्धी माहिती पुढे करून मोकळे होतो व त्या पुढच्यांना मागच्या घडामोडींची म्हणजे पार्श्वभूमीची माहिती असण्याची गरजच नसते. संबंधित न्यायाधीशांनी आपली दिलगिरी नोंदवली आहे व सर्वोच्च न्यायालयानेही आता समज म्हणा किंवा ताकीद देऊन म्हणा हा विषय बंद केला आहे. तथापि, या सगळ्यांतून अति पारदर्शकपणाचा मुद्दाही पुढे आला आहे. न्यायाधीशांच्या म्हणण्यानुसार त्यांनी ते विधान जरूर केले होते, पण त्यामागे जो संदर्भ होता तो वगळला गेला आणि जेवढे हवे तेवढेच पुढे चालवले गेले. मग ही पारदर्शकता आता घातक ठरू लागली आहे का? हा नवा प्रश्न उभा ठाकला आहे. माननीय सरन्यायाधीशांसह सर्वोच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांनीही या विषयावर न्यायालयांच्या बाहेर विविध विचारी मंचांवर ही बाब बोलून दाखवली आहे. न्यायपालिकेच्या कामकाजाच्या प्रक्रियेत पारदर्शकता असली पाहिजे आणि नेमके काय चालले आहे ते लोकांनाही समजले पाहिजे यासाठी ते आवश्यकच आहे. मात्र, कोणी व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह त्यांच्या रोजच्या उत्पन्नाचा भाग म्हणून किंवा अन्य कोणत्या अंत:स्थ हेतून न्यायपालिकेच्या अर्थातच न्यायाधीशांच्या आणि वकिलांच्याही प्रत्येक बाबीवर कॅमेरे रोखून बसत असेल आणि त्याच्या मतलबापुरत्या बाबींचा प्रसार करत असेल तर त्यालाही आळा कसा घालता येईल याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

# गावठी पिस्टल बाळगणारा गजाआड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**शहरामध्ये राजरोसपणे गावठी पिस्तूल बाळगून फिरणाऱ्या ईसमास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेऊन गजाआड केले आहे. कारवाई शुक्रवारी करण्यात आली.**



पोलीस अधीक्षक, बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंध्यावर केसेस करण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना अवैध धंद्दे विरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यावरुन दिनांक २७/०९/२०२४ रोजी स्थागुशा येथील पोह/मारुती कांबळे यांना गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती आधारे अंबाजागाई शहरात यशवंतराव चव्हाण चौक येथे येथे एक इसम कमरेला गावठी कट्टा लावुन फिरत असल्याची खात्रीशिर बातमी मिळताच स्थागुशा पथक उस्मान शेख पो.नि.स्थागुशा बीड यांचे आदेशावरुन कारवाईकामी तात्काळ पाचारण होवून यशवंतराव चव्हाण चौकात सापळा लावला तेथे एक इसम संशयीतरित्या मिळुन आला त्याचे नाव अमित उर्फ सोन्या सुंदर गायकवाड रा. सदर बाजार अंबाजोगाई असे सांगितले त्याची झडती घेतली असता त्याचे जवळ एक गावठी बनावटीची पिस्टल व चार जिवंत काडतुस अवैधरित्या मिळुन आले आहे. सदर आरोपीस ताब्यात घेवुन गावठी पिस्टील व जिवत काडतुस कि.अं. ४४०००/- रु मुद्येमाल करण्यात आला असुन पो.स्टे. अंबाजोगाई शहर येथे आरोपी विरुध्द भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदरची कामगिरी अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली ग्रेपोउपनि हनुमान खेडकर, पोह/मारुती कांबळे, राजु पठाण, महेश जोगदंड, तुषार गायकवाड व चालक गणेश मराडे यांनी केली आहे.

# मुकादम रोहीदास सौंदलकर यांना जिवे मारण्याची धमकी

## पोलीसात गुन्हा दाखल

गेवराई । प्रतिनिधी

**तुझी टोळी अन ट्रॅक्टर घेऊन जात आहोत. तुला काय करायचे तर कर, मधी आलास तर तुझा जिव घेऊ, अशी धमकी, येथील मुकादम रोहीदास आबाराव सौंदलकर, रा. रेवकी देवकी यांना दिल्याने, २५ सप्टेंबर रोजी आरोपी विरूद्ध भान्यासं नुसार पोलीसात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

या बाबत, फिर्यादी सौंदलकर यांनी दिलेल्या माहितीनुसार आबाराव सौंदलकर वय ५० वर्षे मुकादम रा. रेवकी ता. गेवराई जि. बीड , यांना आरोपी संतोष निराजी टेहळे, रा. रेवकी, ता. गेवराई, आणि बापु आंधळे रा. वडवणी जि.बीड या दोघांनी दिनांक २४/०९/२०२४ रोजी सांयकाळी सहा वाजता फिर्यादी घरी असताना फोनवर शिवीगाळ करून, जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपी, मुकादमास म्हणाले की तुझी टोळी व ट्रॅक्टर आम्ही घेऊन जात आहोत. तुला काय करायचेते कर, असे म्हणुन शिवीगाळ करून, जिवे मारण्याच्या धमक्या दिली. तसेच, स्वत: आत्महत्या करण्याचे धमकी ही दिली आहे. म्हणुन भा. न्याय. संहितेनुसार अदखलपात्र गुन्हा दाखल करुन, पुढील तपास पोलीस अधिकारी हांबर्डे यांच्याकडे देण्यात आला आहे.

# मोटार सायकल चोरांची टोळी पकडली; १६ दुचाकी जप्त

बीड । पतिनिधी

**बीड मोटार सायकली चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आज पकडली. यावेळी सोळा मोटारसायकली जप्त करून चोरीचे बारा गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळवले आहे.**

मोटारसायकली चोर गेवराई तालुक्यातील चिखली येथे येणार असल्याची गुप्त माहिती पो.स्टे. शिवाजीनगर गुरनं ४७०/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. या मध्ये चोरी गेलेल्या मोटार सायकलचा समांतर शोध घेत असतांना मिळाली.खात्रीलायक खबर मिळताच पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांना खबर देवुन त्यांनी तात्काळ कारवाई करण्यासाठी सुचना दिल्या वरुन पोउपनि खटावकर यांनी गेवराई येथे पथकासह सापळा लावुन बातमी प्रमाणे मोटार सायकल वरुन येणाऱ्या दोन इसमांना ताब्यात घेवुन नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे रमेश छबु गिरे वय २६ रा.चिखली ता.गेवराई, मच्छिंद्र बबन राठोड वय २२ वर्ष रा.मानसिंगतांडा ता.गेवराई असे सांगितले त्यांना त्यांचेकडे असलेली मोटार सायकल बद्दल विचारले असता त्यांनी चोरी केली असल्याचे सांगितले व त्यांचे कडे अधिक चौकशी केली असता त्यांनी बीड शहर, दिंद्रुड, गेवराई, पाटोदा, माजलगाव, तलवाडा, तसेच पाथर्डी, अंबड, शेवगाव परिसरातुन मोटार सायकली चोरलेल्या असल्याचे सांगितले. यावेळी आरोपींच्या ताब्यातुन एकुण १६ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या. त्यापैकी १२ मोटार सायकलचे गुन्हे उघडकीस आलेले असुन बीड जिल्हयातील विविध पो.स्टे.अंतर्गत ०९ गुन्हे व जालना व अहमदनगर जिल्यातील ०३ असा एकुण ७, लाख६३ हजार रुपयाचा मोटार सायकलचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.आरोपी रमेश छबु गिरे रा.चिखली ता.गेवराई याचा पुर्व गुन्हे अभिलेख पाहता त्याने पुर्वी शिरुर कासार हद्दीमध्ये जनावर चोरी केल्या आहेत. सदर आरोपीतांकडुन आणिखीन इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन दोन्ही आरोपी व १६ मोटार सायकलचा मुद्देमाल पो.स्टे.शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्याची प्रक्रिया चालु आहे. दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, स.फौ संजय जायभाये, पो.हअशोक दुबाले, कैलास ठोंबरे, दिपक खांडेकर, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, विकास वाघमारे, अर्जुन यादव, देविदास जमदाडे, निलेश ठाकुर, विकी सुरवसे, सिध्देश्वर मांजरे यांनी मिळुन केलेली आहे.

# मतदान आपला अधिकार, युवकांनी सजगतेने मतदार नोंदणी करावी–बाबासाहेब उजगरे

वडवणी । प्रतिनिधी

आपल्या देशाचा लोकशाही कारभार ज्या संविधानावर चालतो त्याच संविधानाने तुम्हा आम्हा सर्वांना मतदानाचा खुप मोठा असा अधिकार प्राप्त करुन दिलेला आहे. प्रत्येक पाच वर्षे होणाऱ्या निवडणूकांमध्ये मतदान करुन त्या अधिकाराचा वापर आपण केला पाहिजे. आपल्या या मतदानाच्या माध्यमातूनच देश पातळीपासून ते राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर देखील लोकप्रतिनिधी यांची निवड होते. मतदानामध्ये खुप मोठी ताकद असून प्रत्येकाने आपला मतदानाचा हा हक्क व अधिकार बजावलाच पाहिजे. आपला देश हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. आणि या देशात जर तरुणच मतदानापासून वंचित राहत असतील तर हे शोभा देणारे नव्हे. त्यामुळे ज्यांची वयाची १८ वर्ष पूर्ण झालेले आहेत. अशा सर्व तरुण युवक व युवतींनी तात्काळ आपल्या क्षेत्राचे बीएलओ तसेच तहसील कार्यालयातील निवडणूक विभाग




यांच्याकडे आपली मतदार नावनोंदणी करावी. असे आवाहन २२९ माजलगांव विधानसभा मतदारसंघ स्वीप कक्ष प्रभारी तथा वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी केले. दिनांक २६ सप्टेंबर २०२४ गुरुवार रोजी लोकमान्य टिळक महाविद्यालय वडवणी याठिकाणी वडवणी तालुक्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्रप्रमुख, केंद्रिय मुख्याध्यापक, खाजगी शाळांचे सर्व मुख्याध्यापक, कॅम्पस ॲम्बेसडर्स, ईएलसी मेंबर्स, दिव्यांग तालुका आयकॉन, यांची मतदार जनजागृती निवडणूक पूर्वतयारी व नियोजन बैठक माजलगांव उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी २२९ माजलगाव विधानसभा मतदारसंघ गौरव इंगोले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कक्ष प्रभारी तथा वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या उपस्थितीत व अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी सर्वांना मतदार जनजागृती व निवडणूक पूर्वतयारी आणि नियोजन याविषयी बाबासाहेब उजगरे यांनी सविस्तर असे मार्गदर्शन व माहिती देवून काही अत्यावश्यक सूचना केल्या. सर्वांना आपणांस आगामी विधानसभा निवडणुका ह्या पारदर्शकपणे व निर्भयपणे पार पाडावयाच्या आहेत. यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी प्रत्येकाने अतिशय सूक्ष्मपणे पूर्ण करणे गरजेचे आहे असे यावेळी ते म्हणाले. तसेच लोकमान्य टिळक महाविद्यालय येथील नुकतीच मतदार यादीमध्ये नाव नोंदणी केलेल्या सर्व नवमतदार तरुण युवक व युवती विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देवून स्वागत करण्यात आले. तसेच वडवणी तालुक्यातील चिंचवडगांव येथील रहिवासी असणारे ईश्वर महादेव शेंडगे व त्यांच्या पत्नी सौ.सारिका ईश्वर शेंडगे या दोन अंध दिव्यांग जोडप्याची मतदार नोंदणी सहा नंबरचा अर्ज भरुन घेवून त्या ठिकाणीच ऑनलाईन नव मतदार नोंदणीही करण्यात आली. यावेळी दिव्यांग वडवणी तालुका आयकॉन शिलाताई उजगरे, निवडणूक विभाग तहसील कार्यालय येथील कर्मचारी शिवकुमार टिकुळे यांसह वडवणी तालुक्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्रप्रमुख, केंद्रिय मुख्याध्यापक, खाजगी शाळांचे सर्व मुख्याध्यापक, कॅम्पस ॲम्बेसडर्स, ईएलसी मेंबर्स, दिव्यांग तालुका आयकॉन, शिक्षक, प्राध्यापक, गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील कर्मचारी वृंद, इतर नव मतदार उपस्थित होते.

### दिव्यांग जोडप्याची जागीच केली मतदार नोंदणी..

या कार्यक्रमादरम्यान उपस्थित असलेल्या दिव्यांग वडवणी तालुका आयकॉन शिलाताई उजगरे यांच्यासह वडवणी तालुक्यातील चिंचवडगांव येथील रहिवासी असणारे ईश्वर महादेव शेंडगे व त्यांच्या पत्नी सौ.सारिका ईश्वर शेंडगे हे अंध दिव्यांग जोडपे उपस्थित होते. विशेष म्हणजे हे दोघेही जण आजपर्यंत आपल्या मतदानाच्या हक्कापासून नोंदणी अभावी वंचित होते. २२९ माजलगाव विधानसभा मतदारसंघ स्वीप कक्ष प्रभारी तथा वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी तातडीने त्या दिव्यांग जोडप्याची मतदार नोंदणी सहा नंबरचा अर्ज भरुन घेवून त्या ठिकाणीच ऑनलाईन नव मतदार नोंदणीही करण्यात आली. केवळ नोंदणी अभावी आजही अनेक ठिकाणी दिव्यांग नागरिक मतदानापासून वंचित राहात आहेत. तरी सर्व क्षेत्रीय मतदानाधिकारी बीएलओ यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील मतदार नोंदणी नसलेल्या दिव्यांग नागरिकांचा शोध घेवून त्यांची तात्काळ मतदार नोंदणी पुर्ण करुन घेण्यात यावी असेही आवाहन याप्रसंगी बाबासाहेब उजगरे यांनी केले.

# पान १वरून...

### केज तालुक्यात अल्पवयीन

सुजीत लॉजच्या पाठीमागे नेले. तेव्हा ती सनीला म्हणाली की, ''मामा आले नाहीत. मला आता वसतीगृहावर नेऊन सोड. असे म्हणताच तो तिला म्हणाला की, ''माझे तुझ्यावर प्रेम आहे. तु मला आवडतेस.'' असे म्हणून त्याने तिच्या इच्छेविरूध्द रात्री ९ च्या सुमारास बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर तिने आरडाओरडा केला असता दोघे जण तिथे आले. त्यांनी तिला काय झाले? असे विचारले असता तिने त्यांना आईला फोन लावायचा आहे, असे सांगितले. त्यापैकी एकाच्या मोबाईलवरून तिने आईला घडलेल्या घटनेबाबत सांगितले. त्यानंतर सनीने तिला दहीफळ फाटा येथे नेऊन सोडले आणि तो तेथून तो निघून गेला. त्यानंतर पीडित मुलगी पायी चालत घरी गेली. रात्री उशीरा तिने हा प्रकार आई, मामा आणि नातेवाईकांना सांगितला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके करीत आहेत.

--------

### दुधाच्या अनुदानातील

दर दिला तर त्यावर राज्य सरकार दूध उत्पादकांना ५ रुपये अनुदान देत होते त्यामुळे ३५ रुपये प्रतिलिटरचा दर दूध उत्पादकांना मिळू शकत होता. परंतु आता मात्र दूध संघांनी २८ रुपये दर दिला तर त्यावर ७ रुपये अनुदान राज्य सरकार देणार आहे. म्हणजेच २८+७ रुपये असे एकूण ३५ रुपये प्रतिलिटर दरानेच दूध उत्पादकांना दर मिळणार असल्याचे शासन निर्णयावरून स्पष्ट झाले आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १ ऑक्टोबरपासून करण्यात येणार आहे. तसेच नव्या निर्णयानुसार ३.५ फॅट आणि ८.५ एसएनएफसाठी २८ रु.प्रतिलिटरचा दर देण्यात येणार आहे. तर या गुणप्रतीमध्ये प्रति पॉईंट कमी होणाऱ्या फॅट आणि एसएनएफसाठी ३० पैसे कमी करण्यात येणार आहेत. तर प्रति पॉइंट वाढीसाठी ३० पैसे वाढ करण्यात येणार आहे. पूर्वीच्या शासन निर्णयानुसार याच गुणप्रतिनुसार दूध संघांना, दूध उत्पादकांना ३० रुपये इतका दर देणे बंधनकारक होते. त्यामुळे दूध अनुदानातील वाढलेल्या दरानुसार शेतकऱ्यांऐवजी दूध संघांचा फायदा होणार आहे. या योजनेची अंमलबजावणी १ ऑक्टोबरपासून करण्यात येणार आहे. तसेच लाभार्थी दूध उत्पादकांच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटीच्या माध्यमातून पैसे जमा करण्यात येणार आहेत.

------------

### बजरंग सोनवणे यांची

राज्याचे लक्ष लागले आहे. बजरंग सोनवणे यांची खासदारकी जाते की राहते याची उत्सुकता आता शिगेला पोहचली आहे.

**उत्पन्नाचे स्त्रोत फक्त शेती आणि दुग्ध व्यवसाय**

बजरंग सोनवणे यांनी आपल्या उत्पन्नाचा सोर्स शेती आणि दुग्ध व्यवसाय असल्याचे निवडणूक आयोगाला दिलेल्या शपथ पत्रात नमूद केले आहे. शेती आणि दुग्ध व्यवसाय असताना त्यांनी दाखवलेली संपत्ती मात्र २०० कोटी रुपयांच्या पुढे आहे. ते येडेश्वरी साखर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर असताना त्यांनी शपथ पत्रात तसा उल्लेख केला नाही. त्यामुळे यावर देखील याचिकेतून आक्षेप घेण्यात आला आहे.

-----------

### गेवराईतून मशाल चिन्हावर बदामरा

पुरुषांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी गेवराई स्त्री शक्ती संवाद दौरा आणि शिवसैनिकांचा शक्ती मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात मुख्य मार्गदर्शक म्हणून सुषमाताई अंधारे बोलत होत्या. कार्यक्रमास शिवसेना उपनेते अस्मिताताई गायकवाड, सह संपर्कप्रमुख माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, सहसंपर्कप्रमुख डॉ लक्ष्मणराव सानप, शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, सौ गिरीका भाभी पंडित, राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेश सचिव विद्याताई गाडेकर, संपर्क संघटिका महिला आघाडी संपदाताई गडकरी, शिवसेना जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, जिल्हा संघटक नितीन धांडे, गेवराई तालुकाप्रमुख अजय दाभाडे, बीड तालुका प्रमुख गोरख सिंगम, बीड विधानसभा प्रमुख मीराताई नवले, ॲड दैवशाला शिंदे, युवानेते रोहित पंडित, माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे, युवा नेते यशराज पंडित आदींची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्याला विराट संख्येने उपस्थित असलेल्या महिला, पुरुष शिवसैनिकांसमोर बोलताना शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे म्हणाल्या की, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सामान्य लोकांसाठी काम करणाऱ्या बदामराव पंडित यांची बीड जिल्ह्यातील गेवराईतून शिवसेनेची पहिली उमेदवारी जाहीर केली असून, आता चर्चा करत बसण्यापेक्षा आबांना मोठ्या मताधिक्याने आमदार करण्यासाठी तुम्ही सगळ्यांनी एक जीवाने प्रयत्न करावेत. पुढची संधी पक्षप्रमुख उद्धव साहेब त्यांना देतील असे सांगून, सध्याचे सरकार गद्दारी करून आलेले आहे. हे जनतेच्या हिताचे आणि सुरक्षा देणारे सरकार नाही. गृहमंत्री सपशेल फेल ठरले आहेत. महिला व मुली सुरक्षित नाहीत. बेरोजगारांना नोकरी नाही. महागाई वाढली आहे. परंतु हे प्रश्न सोडविण्याऐवजी सत्ताधार्यांना जेव्हा लोकसभा निवडणुकीच्या बहिणीने जमिनीवर आपटले तेव्हा त्यांना विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडक्या बहिणीची आठवण आली. बहिणीला दीड हजार रुपये देऊन साहेब जाहिरातबाजी करत डांगोरा पेटणारा भाऊ पहिल्यांदा पाहायला मिळतोय. आठरा पगड जातीला सोबत घेऊन चालणारा हा महाराष्ट्र आहे. परंतु दोन जाती आणि धर्मामध्ये वाद निर्माण करण्याचे प्रयत्न सत्ताधारी करत आहेत. त्याला राज्यातली जनता बळी पडणार नाही. या विधानसभा निवडणुकीत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे जास्तीत जास्त आमदार निवडून येतील आणि राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येईल असा विश्वासही सुषमाताई अंधारे यांनी व्यक्त करत, कौटुंबिक पालकत्वाची परंपरा करू खंडित आणि गेवराईतून आमदार करून बदामराव पंडित अशी घोषणा करताच कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष केला. यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करण्यात आली. कोरोनाच्या कालावधीत कुटुंबकर्ता म्हणून भूमिका पार पाडून राज्य वाचवले. शेतीमालाला योग्य भाव दिला. परंतु त्यांच्यासोबत गद्दारी करून भाजपने त्यांना मुख्यमंत्रीपदावरून बाजूला केले. यामुळे सामान्य जनता संतप्त असून उद्धव साहेबांना पुन्हा सत्तेत आणण्यासाठी शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहत आहेत. गेल्या ३० वर्षापासून मी तुमची रात्रंदिवस सेवा केली आहे. कामे केली आहेत आणि यापुढेही करणार आहे. शेतकरी आणि सामान्य माणसांसाठी मी अनेक आंदोलने केली आहेत. आज मला तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. या विधानसभा निवडणुकीत तुमचे दोन महिने माझ्यासाठी, पक्षासाठी आणि उद्धव साहेबांसाठी द्या पुढचे पाच वर्ष दिवस रात्र मी तुमच्यासाठी सज्ज असेल असे आवाहनही बदामराव पंडित यांनी केले. यावेळी पारंपारिक वेशभूषेतील बंजारा समाजाच्या महिलांनी सुषमाताई अंधारे यांचा सत्कार केला. बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, सहसंपर्कप्रमुख लक्ष्मणराव सानप, महिला संघटिका संपादाताई गडकरी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर तालुकाप्रमुख गोरख सिंगम यांनीही आपल्या अभ्यासपूर्ण आणि जोशपूर्ण भाषणात बदामराव पंडित यांना आमदार करूनच मातोश्रीवर गुलाल उधळण्याचा संकल्प बोलून दाखवला. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विजयाच्या घोषणा देऊन, कोण आला रे कोण आला शिवसेनेचा वाघ आला, एकच पंडित बदाम पंडित म्हणत प्रचंड घोषणाबाजी करत जल्लोष केला. या मेळाव्यास माजी सभापती पंढरीनाथ लगड, माजी सभापती तुकाराम हराळे, युवराज डोंगरे, महादेव औटी, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे युवा सेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे, माजी सभापती विठ्ठल जाधव, युवासेना उपजिल्हाप्रमुख सय्यद सिराज, किसान सेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, युवा सेना शहर प्रमुख शेख शेहदाद, सुभाष शिंदे, बदाम पोळ, शेख फत्ते मामू, कल्याण राऊत, जगदीश मस्के, तय्यब पठाण, भाऊसाहेब शिंदे, हरिभाऊ गलधर, विलास शिंदे, सोपानराव जाधव, संतराम काळे, भारत मडके, कैलास राठोड, अविनाश राठोड, आबा उबाळे, अमोल सुतार, प्रभाकर भिसे, सुभद्राताई थोरात, सिद्धेश्वरी कोकाटे, उषाताई कानडे, आदींसह हजारो महिला व पुरुष शिवसैनिक उपस्थित होते.

-----------

### मराठा आंदोलनाचा शरद पवार

होते हे स्पष्ट होईल, असेही म्हणाले. आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीला शरद पवार आतापर्यंत शिताफीने टाळत आले. मात्र, रत्नागिरी येथील सभेत पवारांनी जरांगेंच्या मागणीला पाठिंबा दिला. त्यामुळे ओबीसी नेते बोलत होते त्याप्रमाणे शरद पवार केवळ मराठ्यांचे नेते आहेत, यावर शिक्कामोर्तब झाले असल्याचे ते म्हणाले. मराठवाड्यात जरांगे आणि ओबीसी असा उघड लढा आहे. उर्वरित महाराष्ट्रात लढ्याची तीव्रता शाब्दिक नाही पण, मानसिक आहे. विधानसभा निवडणूकीनंतर ओबीसी आरक्षण जाईल असे त्यांची धारणा झाली आहे. उद्धव ठाकरे देखील ओबीसींचे आरक्षण वाढवून मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी अनुकुल आहेत. आता शरद पवार यांनीही जरांगेंच्या भूमिकेला समर्थन दिले आहे. जरांगे जर निवडणूक लढणार नसतील तर, ते पवारांच्याच इशाऱ्यावर चालत आहे, असे समजू, असेही त्यांनी सांगितले.

-------------

### देवेंद्र फडणवीसांच्या कार्यालयावर

धनश्री सहस्त्रबुद्धे असे महिलेचे नाव असून ही महिला घरी एकटीच राहते. आई - वडिल काही वर्षापुर्वीच मरण पावले आहेत. बहीण लग्न करून गेलेली आहे. सीसीटीव्हीमार्फत महिलेची ओळख पटली आहे. फडणवीसांच्या कार्यालयावर हल्ला करणारी महिला दादरमधील एका सोसायटीतील राहिवासी आहे. दादरमधील सोसायटीत देखील ती चाकू घेऊन फिरत असल्याची माहिती आहे. सोसायटीमध्ये देखील ती लोकांच्या दारावर झाडू मारत फिरत असते. तिच्या अशा प्रकारचे अनेक व्हिडीओ समोर आले आहेत. पोलिसांकडून महिलेचे समुपदेशन करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पोलिसांना जबाब देण्याकरीता महिला तयार नाही. सदर महिला दरवाजा उघडत नसल्याने पोलिसांची अडचण झाली होती. महिला पोलिसांना देखील पाचारण करण्यात आले. महिला मेंटली डिस्टर्ब असल्याचे दादरमधील रहिवाशांचे म्हणणे आहे. संबंधित महिला यापूर्वी सुद्धा मंत्रालयात अनेकदा आली होती. मला सलमान खानचा फोन नंबर द्या, लग्न करायचे आहे, अशी मागणी ती करीत असते. अनेक राजकीय नेत्यांना ती सातत्याने फोन करुन सलमानचा नंबर मागते. यापूर्वी भाजपा कार्यालयात जाऊनही तिने धमकावले होते, त्याची रितसर तक्रार त्यावेळी करण्यात आली होती.

**मंत्रालयातील पोलिसांवर कारवाई होणार?**

सचिव गेटने ही महिला पास न घेता जात असताना या महिलेला अडवले का नाही? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाच्या बाहेर चार पोलीस नेहमी तैनात असतात मग यावेळी पोलिस का उपस्थित नव्हते? असे सवाल सध्या उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे या दोन्ही पॉईंटची जबाबदारी असलेल्या पोलिसांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

--------------

### कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते रोहिदास

मुलगा धुळ्याचे आमदार कुणाल पाटील, विनय पाटील आणि मुलगी स्मिता पाटील असा परिवार आहे. कोल्हापुरातील हृदयरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर पाटील यांचे ते सासरे होत.

------------

### महाराष्ट्र शासनातर्फे उद्या

जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, कृषिभूषण सेंद्रिय शेती पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, उद्यान पंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील, कृषी सेवारत्न पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार अशा नऊ प्रकारात हा पुरस्कार वितरीत केला जाणार आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.२८ सप्टेंबर २०२४


## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत ५२० घरकुलांना मंजुरी -दानवे



जालना : यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत जालना जिल्हयातील ५१८० वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत नुकताच शासनाने निर्णय दिला आहे, यामध्ये जालना विधानसभा (१०१) क्षेत्रातील विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजातील लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी मा केंद्रिय राज्यमंत्री मा.श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने तसेच जालना विधानसभा प्रमुख भास्कर (आबा) दानवे यांनी वारंवार पाठपुरावा करुन विधानसभा क्षेत्रातील वाघ्रूळ, बाजीउम्रद तांडा, सावंगी तलाव, दहीफळ, पिरपिंपळगांव, साळेगांव नेर, बठाण बु., पारेगांव, सामनगांव, धावेडी, वखारी वडगांव, निरखेडा तांडा, नंदापूर, घाणेवाडी, गवळी पोखरी, गोंदेगांव, वडगांव (वखारी) ,पानशेंद्रा, पाहेगांव, वरखेड सिं. , मजरेवाडी, वरुड, देवमुर्ती, मानेगांव जहागिर या गावांमधील एकूण ५२० लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झालेले असून यामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे.विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणणे, त्यांचे राहणीमान उंचावे, त्यांचे उत्पन्न स्त्रोत वाढावे, त्यांना स्थिरता प्राप्त करून देणे. यासाठी त्यांना जमीन उपलब्ध करून तेथे वसाहत उभी करून देणे व त्या ठिकाणी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

# अनुदान टप्पा वाढीची मागणी शासनाने मान्य करावी अन्यथा तीव्र आंदोलन करणार - प्रा.श्रीनिवास काकडे

### आझाद मैदानावरील शिक्षकांच्या हुंकार आंदोलनाची दखल शासनाने घ्यावी म्हणून वडवणी तहसीलदारांना दिले निवेदन

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील ६५००० अंशतः अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना शंभर टक्के पगार द्यावा तसेच १५ नोव्हेंबर २०११ व ०४ जून २०१४ च्या शासन निर्णयानुसार सर्व शिक्षकांना वेतन अनुदान वितरणाचे सूत्र लागू करून ०१ जानेवारी २०२४ पासून विनाआठ टप्पा वाढ लागू करावी या मागणीसाठी १६ ऑगस्ट २०२४ पासून आझाद मैदान मुंबई येथे हुंकार आंदोलन सुरू आहे या आंदोलन कर्त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अर्थमंत्री अजित पवार,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आश्वासन दिले होते सोमवार दि.२३ सप्टेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये अनुदानाचा टप्पा वाढीचा निर्णय आम्ही घेऊ मात्र या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय न घेतल्यामुळे सर्व महाराष्ट्रातील अंशतः



अनुदानित शिक्षकांची घोर निराशा झाली म्हणून समन्वय संघाच्या वतीने शुक्रवार दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी एक दिवशी शैक्षणिक बंदमध्ये सहभागी होऊन आपल्या मागण्यांसाठी मुंबई येथील आझाद मैदानावरील हुंकार आंदोलनामध्ये सहभागी होवे असे परिपत्रक काढले होते त्याच अनुषंगाने शुक्रवार दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी वडवणी येथील तहसीलचे तहसीलदार यांना अंशतः अनुदानित शिक्षक-शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यासाठी आले असता वडवणी तहसीलचे नायब तहसीलदार संजय जिरंगे यांनी निवेदन स्वीकारले त्यांना विनंती केली अंशतःअनुदानित शिक्षकांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचाव्यात.

याप्रसंगी मराठवाडा शिक्षक संघाचे वडवणी तालुकाध्यक्ष प्रा.श्रीनिवास काकडे,प्रा.मुंडे सी.व्ही.,प्रा.अंडील जी.पी.,श्री.मंत्रे व्ही.एन.,प्रा.प्रवीण पाटील,प्रा.संजय केदार,प्रा.ज्ञानेश्वर शेंडगे,प्रा.चोपडे सर,प्रा.मुंडे बी.डी.,प्रा.यादव सर,प्रा.गवारे सर,प्रा.सुनील मुंडे,प्रा.शिवाजी राठोड,प्रा.अशोक पवार,प्रा.विठ्ठल तंबुड,प्रा.अंकुश पवार,श्री.शिंदे सर,श्री.डमरे सर,श्री.सावंत सर प्राध्यापिका कचरे मॅडम,प्राध्यापिका उघडे,प्राध्यापिका शेळके मॅडम,श्रीमती चांदेकर मॅडम,श्रीमती मंत्रे मॅडम,सौ.लवटे मॅडम,श्रीमती दंदे मॅडम यांच्यासह वडवणी तालुक्यातील अंशतःअनुदानित शेकडो शिक्षक-शिक्षिका,शिक्षकत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष तथा लाईव्ह डोंगरचा राजा न्यूजचे संपादक अनिल वाघमारे व न्यूज ट्वेंटी फोर लाईव्ह बीडचे उपसंपादक लहु खर्गे या पत्रकार बांधवानी आंदोलनाचे लाईव्ह प्रक्षेपण केल्याबद्दल शिक्षक समन्वय संघाच्या वतीने आभार मानले.

# भाई ॲड. गोले यांनी शेतकऱ्यांसाठी निवडणूक लढावी -श्रीराम कोरडे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी पुत्र म्हणून लढा, आंदोलने, रस्ता रोको , उपोषणे , लोकांच्या न्याय हक्कासाठी शासकीय कार्यालयाला टाळा लावणे अशी वेगवेगळ्या प्रकारची अनेक ठिकाणी वेगवेगळे आंदोलने करणारे शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि गोरगरीब जनतेसाठी न्यायालयात पण अनेक खटले गोले पाटलांनी स्वखर्चाने लढवून सामान्य व्यक्तीला न्याय मिळवून दिलेला आहे, असे अनेक प्रकारचे सामाजिक कामे, तसेच कोणत्याही गोरगरीब सर्वसाधारण शेतकरी माणसाचे काम जर शासकीय अधिकारी करत नसतील तर गोले पाटील हे प्रत्यक्ष जाऊन त्या माणसाचे काम करतात अशा आपल्या मातीतील, कोणताही गर्व नसलेल्या, माणसात राहणाऱ्या सामान्य माणसाला येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघाचे



प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली पाहिजे यासाठी भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी निवडणुकीत लढावी व शेतकऱ्यांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुण त्यांना प्रचंड बहुमताने विजय करावे,गोले पाटलांचा कामाचा, कार्याचा, लढण्याचा, आंदोलन करण्याचा धडाका पाहिला तर माजलगाव मतदार संघातील इतर अनेक उमेदवाराच्या कार्याची तुलना केल्यास इतर उमेदवार पावसाळ्यातील छत्री प्रमाणे निवडणूक आली की दिसतात, तसेच निवडणूक झाली की पुढील पाच वर्ष कोणत्या बिळात जाऊन बसतात काही कळत नाही, त्यामुळे अशा पावसाळ्यातील छत्री सारख्या उमेदवारापासुन जनतेने सावध राहीले पाहिजे, आणि आपल्या मातीतील माणूस भाई ॲड. नारायण गोले पाटील यांना ताकद दिली पाहिजे त्यांनी आज पर्यंत निस्वार्थ, प्रमाणीक जनतेची सेवा केली असून, त्यांच्या रक्तातच समाज सेवेचे व्रत आहे आशा आपल्या मातीतील, सर्वसाधारण माणसाला प्रेमाची भाषा बोलणाऱ्या, कोणत्याही परिस्थितीत रात्री - अपरात्री कामाला धाऊन येणारा आपला हक्काचा माणूस म्हणजे भाई गोले पाटील त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विधानसभा निवडणुकीत भाई नारायण गोले पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत उभे राहुण जनतेला हक्काचा उमेदवार द्यावा शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शेतकरी बांधव त्यांच्या पाठीशी आहे..

# स्व.मुंडे, स्व.महाजन व बागडे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वात राजकारणाची सुरुवात करून मतदार संघात विकास केला -आ. बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

मराठवाड्यात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने गेलो परंतु परतुर येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने उभारण्यात आलेली नाट्यगृहाची ही वास्तू अत्यंत अप्रतिम असून संपूर्ण मराठवाड्यात अशी वास्तू कुठेही नाही त्यात ज्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्कारामध्ये आम्ही लहानचे मोठे झालो त्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने नाट्यगृहाची ही इमारत उभी राहिली आहे याचा अत्याधिक आनंद असल्याचे प्रतिपादन राजस्थानचे नवनिर्वाचित राज्यपाल व मराठवाड्याची भूमिपुत्र श्री हरिभाऊ बागडे यांनी केले

परतुर येथे माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून साकार झालेल्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृह इमारतीचे राजस्थानचे नवनिर्वाचित राज्यपाल श्री हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले यावेळी राज्यपाल श्री बागडे बोलत होते यावेळी मंचावर आमदार बबनराव लोणीकर राहुल लोणीकर जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अजय कुमार बंसल जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना राज्यपाल श्री बागडे म्हणाले की मागील अनेक वर्षांपासून तत्वाचे आणि शिस्तीचे राजकारण केले असून कोणालाही त्रास होणार नाही याची काय खबरदारी घेतली आहे वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्यामुळे पुढील काळात राजकीय क्षेत्रात काम करता येईल किंवा नाही याबाबत साशंकता असल्यामुळे दीड वर्षांपूर्वीच राजकारणातून निवृत्त होण्याचा निर्णय जाहीर केला होता परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तालमीत तयार झालेलो असल्यामुळे सातत्याने लोकांसाठी काहीतरी चांगले करण्याची



प्रबळ इच्छा आजही मनामध्ये आहे असेही यावेळी हरिभाऊ बागडे म्हणाले

यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की आपण मुंडे महाजन बागडे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वात आपण राजकारणाची सुरुवात केले असून माझ्या परतुर विधानसभा मतदारसंघात विकासाभिमुख कामासाठी सातत्याने प्रयत्नशील राहत आलो आहे त्यामुळेच मतदार संघातील प्रत्येक गावाला डांबरीकरणाचा रस्ता भव्य दिव्य सभामंडप गावांतर्गत सिमेंट रस्ते शुद्ध पिण्याच्या पाण्याची योजना यासह गाव वाडी वस्ती तांब्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिलो आहे त्यामागे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे प्रमोद महाजन यांच्यासह खऱ्या अर्थाने माझे राजकीय गुरु असणारे हरिभाऊ बागडे यांचे पाठबळ कायम राहिले असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांना स्पष्ट केले.राजकीय क्षेत्रात काम करत असताना अनेक अडीअडचणींचा सामना करावा लागला त्या प्रत्येक प्रसंगात हरिभाऊ बागडे नाना कायम माझ्या पाठीशी उभे राहिले अनेक सुखदुःखाच्या प्रसंगात त्यांची अनमोल साथ व भक्कम पाठिंब्यासह मोलाचे मार्गदर्शन सातत्याने मिळत राहिले त्यामुळेच गावातील सरपंच पदापासून राज्याच्या कॅबिनेट मंत्री पदापर्यंत मजल मारू शकलो असे देखील यावेळी लोणीकरांनी स्पष्ट केले पुढे बोलताना ते म्हणाले की प्रत्येक अडीअडचणीच्या काळात हरिभाऊंच्या रूपाने एक भक्कम पाठबळ असणारा नेता कायम माझ्या पाठीशी उभा राहिला राज्याचे मंत्री आणि जालना जिल्ह्याचे पालकमंत्री असताना त्यांनी मला नेहमीच भक्कम पाठबळ दिले असेही यावेळी लोणीकर यांनी स्पष्ट केले पक्षामध्ये किती शिस्तबद्ध पद्धतीने काम केले पाहिजे याचे धडे आम्ही कायम हरिभाऊ नाना बागडे यांच्या माध्यमातून घेत आलो आहोत राजकीय क्षेत्रात काम करत असताना कायम त्यांचा आशीर्वाद आणि पाठिंबा लोणीकर कुटुंबीयांना लाभला आहे अशा शब्दात राहुल लोणीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले पुढे बोलताना ते म्हणाले की मराठवाडा ही साधू संतांची भूमी असून या भूमीतून अनेक कर्तृत्ववान माणसे उभे राहिले आहेत साधू संतांच्या भूमीचा आशीर्वाद सोबत घेऊन मराठवाड्याची भूमिपुत्र हरिभाऊ नाना बागडे यांच्या रूपाने महाराष्ट्र बाहेर राजस्थान मध्ये देखील निश्चितपणे मराठवाड्याचा नावलौकिक वाढवतील त्यांच्या हातून निश्चितपणे सकारात्मक आणि चांगल्या स्वरूपाचे कामे होतील शुभेच्छा देखील यावेळी राहुल लोणीकर यांनी यावेळी आपल्या मनोगत मध्ये दिल्या.राजस्थानचे महामहिम राज्यपाल मध्ये निवड झाल्याबद्दल श्री हरिभाऊ बागडे यांचा आमदार बबनराव लोणीकर राहुल लोणीकर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते परतूर येथे नागरी सत्कार करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले तर आमदार बबनराव लोणीकर राहुल लोणीकर यांनी मनोगत व्यक्त केले.

# फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आरोग्य तपासणी शिबीर




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित फार्मसी महाविद्यालयात दि २६ सप्टेंबर गुरुवार रोजी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आरोग्य तपासणी शिबीर हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात धनवंतरी व माता सरस्वती देवीच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. आरोग्य तपासणी शिबिरासाठी अंबाजोगाई शहरातील नामांकित डॉक्टर प्राजक्ता बर्गे या उपस्थित होत्या.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य तपासणी करणे खूप महत्त्वाचे व गरजेचे असल्याचे सांगितले. वेळोवेळी आपल्या आरोग्याची तपासणी केल्यामुळे कोणतीही समस्या ओळखता येवून त्यावर तात्काळ उपचार करण्यास मदत होते. त्यामुळे आरोग्य तपासणी नियमितपणे करणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्राचार्य डॉ संतोष तरके यांनी सांगितले. या आरोग्य तपासणी शिबिरात क्रोनिक आजार असलेल्या नागरिकांनी तसेच विशिष्ट वयोमानाच्या नागरिकांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे अत्यंत आवश्यक असल्याचे डॉ. प्राजक्ता बरगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यां व नागरिकांना सांगितले. लहान मुलांसाठी देखील आरोग्य तपासणीची आवश्यकता खूप महत्त्वाची आहे. यामुळे त्यांच्या आरोग्याच्या स्थितीवर लक्ष ठेवता येते आणि त्यांचे विविध आजारांपासून संरक्षण करता येते. मुलांच्या आरोग्य तपासणी मुळे त्यांच्या वाढीचा आढावा, निदान, टीकाकरण, मानसिक आरोग्य, जीवनशैलीची माहिती उपलब्ध करता येते. त्यामुळे मुलांसाठी आरोग्य तपासणी नियमितपणे करणे अत्यंत आवश्यक आहे कारण यामुळे त्यांच्या संपूर्ण आरोग्याची काळजी घेता येते आणि त्यांना निरोगी आणि खुशाल जीवन जगण्यास मदत होईल असे मत डॉ प्राजक्ता बर्गे यांनी व्यक्त केले. महाविद्यालया मध्ये घेण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबीरात विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या. त्या मध्ये पल्स रेट, वजन, हीमोग्लोबिन, ऑक्सीजन, सीबीसी, ब्लड ग्रुप, एच बी आणि बीपी च्या तपासणी घेण्यात आल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्यासह सर्व प्राध्यापक , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.



पाटोदा - डोंगरचा राजाचे संपादक अनिल वाघमारे यांची नुकतीच मराठी पत्रकार परिषदेच्या डिजीटल मिडीया विंगच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्यानिमीत्त पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषद यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या . याप्रसंगी पत्रकार हमीदखान पठाण , अजय जोशी, अशोक भवर, दैनिक राज्य लोकतंत्र चे सय्यद फयाज सह इतर उपस्थित होते.

# पोलीस वर्दीची भीती न ठेवता आदरयुक्त मैत्री असावी -सूर्यतळ

माजलगाव । प्रतिनिधी

येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल मध्ये मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाला. यावेळी विद्यार्थी,पालक उपस्थित होते.

राहुल सूर्यतळ यांनी त्यांच्या भाषणात विद्यार्थ्यांना पोलीस खाकीची भीती न बाळगता त्यांच्याविषयी मित्रत्वाची भावना तयार व्हावी. तसेच लहान वयातच हे संस्कार मिळू शकते. तसेच विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होईल असे शिक्षण त्यांना मिळाले पाहिजे. असे त्यांनी त्यांच्या भाषणातून मार्गदर्शन केले व सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रिन्सिपल अमृता तौर यांनी ऑनेस्टी पब्लिक स्कूलमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रम व्यतिरिक्त भरपूर कम्युनिटी संकल्पना व प्रात्यक्षिक शिक्षण देण्यात येते. अध्यक्षीय समारोप शाळेचे संस्थापक डॉ.विठ्ठल वाघ यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात योगदान देणारे महापुरुषांचे स्मरण करून. उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुप्रिया गरुड यांनी केले तर पाहुण्यांचे आभार प्रदर्शन माजी विद्यार्थिनी कु.जान्हवी वाघ यांनी मानले. यावेळी सर्व शाळेचा टीचर स्टाफ, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

## आपसातील 'कलगीतुरा' बंद करा '४०' वर्षांच्या विकासाचा अहवाल जनतेपुढे मांडा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बचाव मंचाने दिले महाभ्रष्ट सत्ताधाऱ्यांना आव्हान...

एकीकडे बीड शहरातील जनतेवर संकटांचे डोंगर कोसळत असताना. या सत्ताधाऱ्यांना कलगीतुरा खेळण्याचे नाटक सुचतेच कसे? पावसाचे आणि गटारांचे



**नितीन जायभाये यांचे आव्हान**

पाणी बिडकरांच्या घरात आणि दुकानांमध्ये "घुसवून* बीडच्या जनतेला जिवंतपणे नरकात पाठवणाऱ्या या नितीभ्रष्ट झालेल्या महाभ्रष्ट नरकासुरांना गेल्या ४० वर्षात बीडचा काय विकास केला याचा हिशोब जनतेपुढे मांडवाच लागेल. या बीड शहरात बाजारपेठेंच्या मुख्य रस्त्यावर कुठेही अद्यावत महिला स्वच्छतागृहे हे महाभृष्ट सत्ताधारी आजपर्यंत बांधू शकले नाहीत हाच काय यांचा विकास...? बीड शहरातील आया- बहिणींच्या मायमाऊलींच्या बद्दल असलेली तळमळ .....? हेच का यांचे

"पर्व "? कधी यांनी बीडमध्ये उद्योग व्यवसाय वाढण्यासाठी व औद्योगिक क्षेत्र आणण्यासाठी प्रयत्न केले...? कायम फक्त आपलीच घरं भरली. बीड करांना इतर शहरांमध्ये गेल्यानंतर तेथील नगरपालिका मूलभूत सोयी सुविधा किती चांगल्या पद्धतीने पुरवितात हे पाहून अक्षरशः लाज वाटते.. शरमेने मान खाली जाते. तिथे भेटलेली लोकं म्हणतात ... अहो तुम्ही बीडचे का.. आजही खूपच मागासलेला असलेला भाग आहे तुमचा... तेव्हा खरंच आपल्या सर्व "विकास पुरुषांबद्दल" फार अभिमान वाटतो... कधी थांबणार हे सगळं..? कलगीतुरे थांबवा आणि विकासाचा अहवाल जनतेपुढे सादर करा ही मी जिम्मेदारी पूर्वक बीड शहरातील जनतेच्या वतीने व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने मागणी करत आहे.

# गिरीराज पतसस्था सभासदाचे व संस्थेचे हित जोपासत प्रगती करत राहणार -अनिल चिद्रवार

किल्लेधारूर । प्रतिनिधी

गिरीराज नागरी सहकारी पतसंस्था शहरात व्यापारपेठेत सभासद व्यापा-याना प्रगती करता आर्थीक पाठबळ देण्याचे काम करते सभासद व संस्थेचे हित जोपासत संस्था प्रगती करत राहील असे प्रतीपादन ३३ व्या वार्षीक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन अनिल चिद्रवार यांनी व्यक्त केले.

धारूर व परीसरात गेल्या ३४ वर्षा पासून सहकार क्षेत्रात यशस्वी पणे चालणारी सस्थापक अध्यक्ष सुंमतराव डुबे यांचे मार्गदर्शना खाली यशस्वी पणे कारभार सुरू असलेली गिरीराज नागरी सहकारी पतसंस्थेची ३३ वी सर्वसाधारण सभा पतसस्थेच्या सभागृहात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्ष स्थानी जेष्ठ सभासद पुरूषोत्तम कंकाळ हेतर व्यासपीठावर चेअरमन अनिल चिद्रवार व्हाईस चेअरमन रामेश्वरआप्पा गुळवे हे उपस्थीत होते. यावेळीप्रथम सस्थेचा कार्याबद्दल चेअरमन अनिल चिद्रवार यानी संस्थेचा




प्रगतीचा अहवाल सभासदा समोर मांडला संस्था पाच लाखा पेक्षा जास्त नफा झाल्याचे सांगत संस्थेचे संस्थापक मार्गदर्शक सुमतराव डुबे यानी सभासद शहरातील व्यापारी याना आर्थीक पाठबळ मिळण्या साठी व प्रगती साधण्या साठी हि संस्था चालवली हे ध्येय समोर ठेवत हे संचालक मंडळ काम करत असुन सस्थेच्या आर्थीक प्रगती करता संस्थेचे कर्ज घ्यावे व वेळेत परत करावे संस्थेचे हित जोपासावे येणारे काळात विवीध उपक्रमसंस्था राबवणार असल्याचे सागीतले. यावेळी बोलताना जेष्ठ सभासद अनिल महाजन यांनी सस्थेच्या प्रगतीचे कौतूक करत पश्चीम महाराष्ट्रातील पतसंस्थाचा आदर्श घेऊन गिरीराज पतसंस्थेचे संचालक मंडळ काम करत आहे त्यांचे कार्यचे कौतूक केले. सभासदानी संस्थेच्या प्रगती करता वेळेत कर्ज परतफेड करून सहकार्य करण्याचे अवाहण केले.

यावेळी सस्थेच्या सचिव सरीता वेदपाठक यानी सभासदा समोर अहवाल वाचन केले याला मंजूरी ची सभासदाना विनंती केली सभासदानी एकमताने यांला मंजूरी दिली.यावेळी सचालक अनंत काळे, परमानंद तोष्णीवाल सभासद दिपक गुळवे अनिल कंकाळ यानी काही सुचना केल्या त्याचेज्ञपालन करण्याचे अश्वासन देण्यात आले. अभार सचिव सरिता वेदपाठक यानी मानले. या सर्वसाधारण सभेला सर्व संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

पान ६ वरून...

### स्वा.रा.ती. रुग्णालयाच्या

आरोग्य मंत्री यांना लगेचच भेटणार आहे. त्यासोबतच स्वा.रा.ती. रुग्णालयात स्वतंत्र कर्करोग निदान रुग्णालय आणि अति दक्षता (सुपर स्पेशालिटी) रुग्णालयासाठी प्रयत्न करणार आहे. येणाऱ्या काळात ही दोन्ही मुद्दे मार्गी लागलेले आपल्याला दिसतील, असे गोपछडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.त्यांनी स्वराज्य रुग्णालयातील वेगवेगळ्याविभागाचा आढावा घेतला व त्यावर आपण तोडगा काढणार असल्याचे सांगितले.या पत्रकार परिषदेला भा.शि.प्र.संस्थेचे माजी कार्यवाह नितीन शेटे आणि युवा नेते विनोद पोखरकर तसेच पत्रकार उपस्थित होते.

### सकल नाभिक समाजाचे

केलेले केशकला बोर्ड अग्रेषित करून दि.०५ जाने २०२४ रोजी ओबीसी महामंडळाची उपकंपनी करण्यात आलेली आहे.अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासाठी निधीची तरतूद केलेले आहे,परंतु कोणतीही अद्याप कारवाई झालेली नाही. त्यामुळे शासनाने ५ वर्षात समाजाला फक्त आश्वासनांचे गाजर दाखवून फसवणूक केली असल्याची भावना नाभिक समाजाची झाले आहे.म्हणून महाराष्ट्रातील विविध संघटना एकत्र आल्या आहेत.

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर हांगे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांचे जीवन कसे घडते व समाजसेवा करण्याची संस्कृती कशी बिंबवली जाते हे स्पष्ट केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. अतिथी वक्त्यांचा परिचय प्रा. विठ्ठल शिंदे यांनी दिला. आभार डॉ. जालिंदर लोणके यांनी मानले. कार्यक्रमास रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.




# केंद्रीय अधिकाऱ्यांनी दिली लासलगाव बाजार समितीला भेट

## संचालकांनी शिष्टमंडाळकडे केली ही मागणी




नाशिक : केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांनी लासलगाव येथील बाजार समितीला भेट दिली. सन २०२४ च्या खरीप हंगामातील कांदा पिकाचे क्षेत्र, अंदाजित उत्पादन, बाजारातील आवक, बाजारभाव आणि निर्यात विषयक धोरण त्याचबरोबर शेतकरी आणि व्यापारी वर्गाच्या अडीअडचणींबाबत चर्चा करण्यासाठी केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी लासलगाव बाजार समितीला काल भेट दिली, असल्याचे सांगण्यात आले आहे. खरीप कांद्याची नाशिक जिल्ह्यासह राज्याच्या इतर भागात मोठया प्रमाणात लागवड झाली असून नवीन लाल कांदा लवकरच विक्रीला येणार आहे.

त्यामुळे केंद्र शासनाने कांदा निर्यातीवरचे २० टक्के निर्यात शुल्क कमी करावे तसेच जास्तीत जास्त कांदा निर्यात होण्यासाठी व्यापाऱ्यांना वाहतुकीवर अनुदान द्यावे, असे लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर यांनी शिष्टमंडळाला सांगितले.

अफगाणिस्तानचा कांदा भारतात दाखल : केंद्र सरकारने कांदा दर नियंत्रणासाठी अफगाणिस्तानचा टन कांदा आयात केल्यामुळे शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त केला आहे. यंदा पावसाळी कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. चाळीमध्येही शेतकऱ्यांचा कांदा शिल्लक आहे, अशा परिस्थितीत हा कांदा आयात करू नये तसेच सरकारने कांदा आयातीवर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे



ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते. उस पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. ऊस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही. बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

## खेड मधील 'खरपुड'ला रंगणार रानभाज्यांचा सोहळा



खेड : नैसर्गिक, शुद्ध, सात्त्विक व बहुगुणी स्रोत असलेल्या रानभाज्यांच्या पोषणमुल्यांचे महत्व पटवून देत त्यांच्या जतन व संवर्धनाला चालना दण्यासाठी येत्या रविवारी (दि. २९) खरपूड (ता. खेड, पुणे) येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

खरपुड, म्हसेवाडी, भोरगिरी, भोमाळे (वरचे), येळवली, भिवेगाव व भोमाळे (खालचे) या भिमाशंकर अभयारण्यातील सात गावांतील १५० हून अधिक महिला या महोत्सवात रानभाज्यांच्या पाककृती सादर करणार आहेत. उपस्थितांना विविध प्रकारच्या रानभाज्यांचा आस्वाद घेण्याबरोबरच रानभाज्यांविषयी माहिती देऊन त्यांच्या जतन व संवर्धन चळवळीस हातभार लावता येईल, अशी माहिती उपक्रम प्रमुख प्रदीप चव्हाण यांनी दिली. ग्रामपंचायत खरपूड, वनश्री महिला ग्रामसंघ, कल्पवृक्ष, बाएफ, शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशन, पंचायत समिती खेड व एस.एम.सुपे मेमोरियल फाऊंडेशन या संस्थांनी संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन केले आहे.

विक्री नव्हे तर जतन संवर्धन : वनक्षेत्रातून अतिरेकी संकलन झाल्याने अनेक औषधी वनस्पती व रानभाज्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे या महोत्सवात रानभाज्या विक्रीवर बंदी आहे. रानभाज्यांचा स्वाद अनुभव आणि जतन संवर्धनसाठीचे उपक्रम हे या महोत्सवाचे वैशिष्ट्य आहे. सहभागी महिलांमार्फत रानभाजी जतन संवर्धनाच्या प्रतिज्ञेसोबतच आदिवासी कुटुंबांना रानभाज्यांचे बियाणे वितरित करण्यात आहे.

आगळेवेगळे रानभाजी टेस्टिंग : महिलांनी बनवलेल्या सुमारे ४० प्रकारच्या रानभाज्या टेबलवर रांगेत मांडलेल्या असतील. सोबत नाचणी, तांदळाच्या भाकरी असतील. सहभागी व्यक्तींना एकेका रानभाजीची चव व माहिती घेत पुढे पुढे सरकत महोत्सवाचा आस्वाद घेता येईल. यानंतर स्वतंत्र भोजन पंक्तीत आदिवासींच्या पारंपरिक जेवणाचा आनंद घेता येईल. एकूणच भिमाशंकर अभयारण्याच्या कुशीतील रानभाज्यांचा स्वाद व पारंपरिक आदिवासी जेवणाचा मनमुराद आस्वाद असे स्वरूप आहे.


## कृषी सहायकांच्या समस्यांवर पुण्यातील बैठकीत चर्चा



पुणे : महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेची राज्यस्तरीय आढावा बैठक नुकतीच पुण्यात झाली. या बैठकीत कृषी सहायकांच्या विविध समस्या, प्रलंबित प्रश्नांवर चर्चा झाली. या बाबत कृषी आयुक्तस्तरावर लवकरच पाठपुरावा करण्याबाबत ठरवण्यात आले.

या बैठकीला राज्यातील विविध जिल्ह्यांतून राज्य कार्यकारिणी सदस्य, जिल्हाध्यक्ष, जिल्हा सचिव उपस्थित होते. राज्याचे सरचिटणीस सोमनाथ बाचकर यांची कृषी पर्यवेक्षकपदी पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. आजवर त्यांनी कृषी सहायक संघटनेत आघाडीवर काम केले. त्यांचे संघटनेसाठीचे योगदान पाहता ही पोकळी कधीही भरून निघणारी नाही, अशा भावना या वेळी अनेकांनी आपल्या मनोगतात मांडल्या. अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष संदीप बोदगे यांचाही पदोन्नतीबद्दल सत्कार करण्यात आला. या सभेमध्ये संघटनेच्या रिक्त पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या. राज्य सरचिटणीसपदी महेंद्र गजभिये (नागपूर), सरचिटणीसपदी जय किर्तिमान पाटील (नाशिक), सह कोषाध्यक्षपदी प्रसाद पाटील (रायगड) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानंतर कृषी सहायकांच्या विविध अडचणींवर चर्चा झाली. या वेळी संघटनेचे राज्य अध्यक्ष संदीप केवटे, शरद सुरळकर, वसंत जरीकोटे, उमेश मोहिते, स्वाती झावरे, अंजना सोनवलकर, शांताराम कसबे, प्रवीण ठाकरे, अनिल भोई, प्रशांत दोरगे, स्वप्नील भुजबळ, योगिता माने, भगत, जाधव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## आंबा फळपिकांस द्या संतुलित खत मात्रा



आंबा लागवड सर्वसाधारणपणे कोणत्याही जमिनीमध्ये होऊ शकते, मात्र पाण्याचा निचरा होणारी जमिन असावी. सर्वसाधारणपणे जमिनीचा सामू ५.५ ते ७.५ पर्यंतच्या जमिनीमध्ये आंबा लागवड यशस्वी होते. आंब्याला लालसर जमिनीपासून ते नदीकाठच्या गाळाच्या, पोयट्याची जमिन उत्तम असते. जमिनीची खोली २ ते २.५ मी. असावी. आंब्याच्या योग्य वाढीसाठी जमिन मध्यम प्रकारची, पाण्याचा निचरा होणारी व पाण्याची पातळी २ मीटरच्या खाली असणारी असावी.चुनखडीचे प्रमाण १० टक्क्या पेक्षा कमी असावे. चोपण जमिन, खूप हलकी, कठीण मुरूम,पाषण असणारी जमिन आंब्यासाठी अयोग्य असते. डोगर उताराच्या जमिनीवर आंब्याचे उत्पादन कमी येते. खूप खोल, काळ्या भारी जमिनीत आंबा उत्पादन चांगले येत नाही. जमिनीचा उतार माफक असावा व पावसाचे पाणी साठवून राहू नये. खूप उताराच्या जमिनीत पाणी वाहून जाण्याचे प्रमाण अधिक असल्याने आंबा पिकास वारवार पाणी दयावे लागते. आंब्याची मुळे खोलवर जातील या दृष्टीने फुटणारा मुरूम असणारी जमिन आंब्यास मानवते.

आंबा रोपांची/कलमांची लागवड : प्रथम लागवड करण्यापूर्वी अगोदरच भरून ठेवलेल्या खड्ड्याच्या मध्यभागी कलमाच्या पिशवीच्या दोन्ही बाजूंवर उभा काप द्यावा व मुळाभोवती असलेला मातीचा गोळा न फुटता पॉलिथीन बॅग काढावी. मोकळा झालेला गोळा दोन्ही हातात धरून खड्ड्याच्या मधोमध ठेऊन हलकेच दाबावा व मोकळ्या हाताने माती भरून गोळ्याभोवती माती टाकावी.अगोदर हाताने व नंतर पायांनी दाबावी,हे करताना मातीच्या गोळ्यावर पाय पडणार नाही याची काळजी घ्यावी. आवशकता वाटल्यास हलकेसे पाणी द्यावे.आधारासाठी पश्चिम बाजूस ६ इंच अंतरावर ४ ते ५ फुट बांबूची काठी रोऊन त्यात कलम बांधावी.

कलमांची निगा: पहिली तीन वर्ष आंबा कलमांना येणारा मोहोर काढून टाकावा.त्यामुळे झाडांची वाढ चांगली होते. चौथ्या वर्षापासून उत्पन्न घेण्यास सुरुवात करावी. कलमांचे बुरशीजन्य रोग व उन्हापासून सरंक्षण करण्यासाठी पावसाळ्यानंतर कलमांच्या बुंध्यावर बोर्डो पेस्ट लावावी. पहिले दोन - तीन वर्ष नियमित पाणी द्यावे.

खतांचे व्यवस्थापन : आंबा कलम जोमाने वाढण्यासाठी व भरपूर फळे येण्यासाठी दरवर्षी कलमाच्या वयोमानानुसार तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे खते देणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे जून-जुलै महिन्यात संपूर्ण शेणखत, संपूर्ण स्फूरद व पालाशची मात्रा द्यावी व नत्राची मात्रा एक किंवा दोन हप्त्यात विभागून द्यावी.

खताची मात्रा देताना बांगडी पद्धतीने द्यावीत. मध्यान्ही झाडाची सावली जेवढ्या भागावर पडेल त्या क्षेत्राच्या मधोमध १ ते १.५ मीटर दूर,१५ से. मी. खोल आणि ३० ते ४५ से.मी. रुंद चर घेऊन गोलाकार पद्धतीने द्यावीत. प्रथम चरात पालापाचोळा व शेणखत टाकून नंतर रासायनिक खते सर्व बाजूनी सारखी टाकावी नंतर चर मातीने बुजवावा. पहिल्या वर्षी ३०० ग्रॅम युरिया + ३०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट + २०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे. कलमाचे वय वाढत जाईल तसे हे प्रमाण प्रतिवर्षी १ घमेले शेणखत +३०० ग्रॅम युरिया + ३०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट + २०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश या प्रमाणात वाढवावे. पूर्ण वाढलेल्या आंब्याच्या झाडास ५० किलो शेणखत/कंपोस्ट , दीड किलो नत्र, अर्धा किलो स्फूरद व अर्धा किलो पालाश प्रती झाड जून-जुलै महिन्यात व नत्र दोन समान हप्त्यात द्यावे. म्हणजेच ३ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + २ किलो म्युरेट ऑफ पोटॅश दयावे. युरिया विभागून द्यावा.




### जागतिक दिवस:
### जागतिक रेबीज दिन
### जागतिक कर्णबधिर दिन
### आंतरराष्ट्रीय सुरक्षित गर्भपात दिन

### महत्वाच्या घटना

१८३७ : साली अंतिम भारतीय मुघल सम्राट बहादूर शहा द्वितीय दिल्ली येथील सम्राट बनले.
१९२४ : पहिली पृथ्वी प्रदक्षिणा करणारी विमान फेरी पूर्ण झाली.
१९२८ : सर अलेक्झांडर फ्लेमिंग यांना आपल्या प्रयोगशाळेत एका विशिष्ट प्रकारच्या जीवाणूंची वाढ होताना आढळली. यातुनच पुढे 'पेनिसिलीन' या प्रतिजैविकाचा शोध लागला.
१९३९ : दुसरे महायुद्ध वॉर्सॉने नाझी जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९५० : इंडोनेशियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९५८ : साली फ्रांस देशांत संविधान आमलात आणण्यास मंजुरी देण्यात आली.
१९६० : माली आणि सेनेगलचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९९ : महाराष्ट्र सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांना जाहीर
२००० : विख्यात नाटककार आणि साहित्यिक विजय तेंडुलकर यांना 'विष्णूदास भावे गौरव पुरस्कार' जाहीर
२००२ : सलमान खान यांच्या पांढऱ्या टोयोटा लँडक्रुझर गाडीचा वांद्रे येथे अपघात, अपघातात १ मृत्यू टर ४ गंभीर जखमी. सलमान खानच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले. पोलिसांकडून अटक व जमीन वर सुटका.
२००८ : साली स्पेसएक्स कंपनीने बनविलेले फाल्कन १ हे यान पृथ्वीच्या कक्षेत जाणारे पहिले खासगी-विकसित द्रव-इंधन प्रक्षेपण वाहन बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०३ : प्रॉस्पर मेरिमी फ्रेंच कथालेखक, नाटककार, इतिहासकार आणि पुरातत्त्वज्ञ (मृत्यू: २३ सप्टेंबर १८७०)
१८३६ : बॉलकोक चे संशोधकथॉमस क्रैपर यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १९१०)
१८६७ : जपानी पंतप्रधान कीचिरो हिरानुमा यांचा जन्म.
१८९८ : शंकर रामचंद्र तथा मामाराव दाते स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार, हिंदू महसभेचे अध्यक्ष, देवनागरी लिपी बसवणारे म्हणून त्यांनी लौकिक मिळवला
१९०७ : भगत सिंग क्रांतिकारक (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९०९ : पी. जयराज मूकपटांच्या जमान्यापासून हिन्दी चित्रपटसृष्टीचे साक्षीदार असलेले दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९८०) अभिनेते (मृत्यू: ११ ऑगस्ट २०००)
१९२५ : अमेरिकन संगणकशास्त्रज्ञ सेमूर क्रे यांचा जन्म.
१९२९ : लता मंगेशकर सर्वाधिक गाणी गाण्याचा विक्रम असलेली पार्श्वगायिका, भारतरत्न, दादासहेब फाळके पुरस्कार, पद्मभूषण
१९६६ : भारतीय दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक पुरी जगन्नाथ यांचा जन्म.
१९४६ : माजिद खान पाकिस्तानी क्रिकेट कप्तान
१९४७ : शेख हसीना बांगलादेशच्या १० व्या पंतप्रधान
१९४९ : साली भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी वे४० सरन्यायाधीश राजेंद्रमल लोढा यांचा जन्मदिन.
१९८२ : अभिनव बिंद्रा ऑलिम्पिक स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक मिळवणारा पहिला भारतीय
१९८२ : रणबीर कपूर अभिनेता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३७ : साली भारतातील शेवटचे मुघल शासक बादशहा अकबर द्वितीय यांचे निधन.
१८९५ : लुई पाश्चर फ्रेन्च सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (जन्म: २७ डिसेंबर १८२२)
१९३५ : कायनेटोस्कोप चे संशोधक विल्यम केनेडी डिक्सन यांचे निधन. (जन्म: ३ ऑगस्ट १८६०)
१९५३ : एडविन हबल अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ (जन्म: २० नोव्हेंबर १८८९)
१९५६ : विल्यम बोईंग बोईंग विमान कंपनीचे संस्थापक (जन्म: १ आक्टोबर १८८१)
१९७० : इजिप्तचे दुसरे राष्ट्राध्यक्ष गमाल अब्दल नासर यांचे निधन.
१९८१ : व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष रोम्लो बेटानको यु र्ट यांचे निधन.
१९८९ : फर्डिनांड मार्कोस फिलिपाइन्सचे १० वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ११ सप्टेंबर १९१७)
१९९१ : अमेरिकन जॅझ संगीतकार माइल्स डेव्हिस यांचे निधन.
१९९२ : मेजर ग. स. ठोसर पानशेत पूरग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी दीर्घकाळ लढा देणारे
१९९४ : भारतीय चित्रपट अभिनेते आणि कॉमेडियन के. ए. थांगवेलू यांचे निधन. (जन्म: १५ जानेवारी १९१७)
२००० : श्रीधरपंत दाते सोलापूरचे प्रसिद्ध पंचांगकर्ते
२००४ : डॉ. मुल्कराज आनंद लेखक (जन्म: १२ डिसेंबर १९०५)
२०१२ : ब्रजेश मिश्रा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (जन्म: २९ सप्टेंबर १९२८)
२०१२ : माधव एस. शिंदे प्रख्यात चित्रपट संकलक (शोले, सीता और गीता, शान, रझिया सुलतान, सोहनी महिवाल, सागर, चमत्कार), फिल्मफेअर सर्वोत्तम चित्रपट संकलक पारितोषिक विजेते (शोले १९७५) (जन्म:१९२९)
२०१५ : साली साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी कवी, शैक्षणिक आणि पत्रकार वीरेन डंगवाल यांचे निधन.

# उपोषणाचा ८ वा दिवस : मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा परिषद कार्यालय समोर मुख्य गेटवरील उपोषण सुरू असून परंतु त्याच रस्त्याने मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना जात असून ८ दिवसापासून बसलेलं उपोषण यांना दिसत नाही का असा प्रश्न उपोषण त्यांच्याकडून बोलल्या जात आहे. वारंवार तक्रारी देऊन सुद्धा ग्रामपंचायत परतवाडी येथील ग्रामसेवक व सरपंच यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी न करता विस्तार अधिकारी यांना हाताशी धरून कोणत्याच तक्रारीची दखल न घेतल्यामुळे दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद जालना समोर आमरण उपोषणास सुरू आहे. . परतवाडी येथील विविध कामात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे याबाबत प्रशासनाकडे वारंवार अनेक तक्रारी केल्या आहेत. मात्र ग्रामसेवक रविन्द्र जगताप आणि सरपंच यांनी संगनमताने व विस्तार अधिकारी श्री परदेशी यांना हाताशी धरून सर्व कामे बोगस करून माझ्या तक्रारींची कसलीही दखल घेतली नाही.



तसेच मी काही बाबींचा भ्रष्टाचार उघड करण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विविध माहिती संवैधानिक मार्गाने योग्य शुल्क भरून मागितली तरीही जाणूनबुजून बामसेवक, विस्तार अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांनी मला कसलीच माहिती दिली नाही १-५ माहिती दिल्याने सर्व भ्रष्टाचाराच उघडा पडेल आणि आपल्यावर फौजदारी गुन्हे दाखल होतील मती परतू ची जाणिव असल्याने माहिती देण्यास ही सर्व भ्रष्ट यंत्रणा टाळाटाळ करत आहे . दिनांक १८/०९/२४ ग्रामपंचायत सदस्य विभागीय ग्रामपंचायत कायद्यानुसार कोणत्याही मासिक बैठका घेतल्या नाहीत, अनाधिकृत अतिक्रमणे करून बांधकामे केली आहेत, विविध योजनांचे लाभ के आहेत, स्वत्थ अधीक्षासुद्धा काही ये वैयक्तिक घेतले च्या फायद्यासाठी ग्रामपंचायत चा रहिवाशी नसणाऱ्या व ईतर गावातील लोकांना योजनांचा लाभ बेकायदेशीर दिला आहे आहे त्याबाबत माहिती लपवली जात संदर्भात जिल्हाधिकारी यांनाही निवेदन देण्यात आली आहे तरीपण कारवाई होत नाही लोकशाही आहे का हुकमशाही. आहे. ग्रामपंचायत च्या बैंक अकाउंट मधून वैयक्तिक नावाने चेक उचलून शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार केला आहे. सर्व प्रकरण जिल्हाधिकारी यांच्याकडे सरपंच अपात्रतेबाबत व ग्रामसेवक निलंबन करून दोघांवर फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत प्रकरणे वर्षभरापासून दाखल आहेत. यामध्ये सुद्धा जिल्हाधिकारी यांनी मागवलेल्या अहवालाला ग्रामसेवक रविंद्र जगताप व विस्तार अधिकारी परदेशी हे केराची टोपली दाखवून जाणूनबुजून विलंब करत आहेत आणि शेवटी विस्तार अधिकारी परदेशी यांनी जिल्हाधिकारी यांना खोटा अहवाल सादर करून सरपंच व ग्रामसेवक यांच्या भ्रष्टाचाराला पाठीशी घालून पाठबळ देत आहेत. सरपंच आणि ग्रामसेवक यांनी तांडा वसती, रोजगार हमी योजनेत सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला असून त्यांना विस्तार अधिकारी परदेशी आणि गटविकास अधिकारी यांचे अभय आहे. म्हणुनच या बोगस कामांची माहिती सबळ पुराव्यानिशी दिल्यानंतर सुद्धा ना चौकशी होते ना कार्यवाही होते. वरून आम्ही आमदार बबन लोणीकर यांचा माणसे आहोत आमचे कोणी काही वाकडे करू शकत नाहीत आम्ही सर्व अधिकाऱ्यांना खिश्यात घेऊन फिरतो अश्या प्रकारची भाषा वापरत आहे. गेल्या दोन वर्षापासुन सतत भ्रष्टाचाराची साधी चौकशी सुद्धा सबळ पुरावे असतानाही केल्या जात नाही म्हणून मी उपोषण करीत आहे. या सर्व भ्रष्ट व्यवस्थेला कंटाळून मला न्याय मिळण्यासाठी मी लोकशाही मार्गाने दिनांक १९ सप्टेंबर २०२४ खालील मागण्यांसाठी ''आमरण उपोषण करीत आहे सरपंच आणि उपसरपंच यांना अपात्र घोषित करावे. ग्रामसेवक रविंद्र जगताप, विस्तार अधिकारी परदेशी, गटविकास अधिकारी, परतवाडी सरपंच आणि उपसरपंच यांच्यावर फौजदारी गुन्हे त्वरित दाखल करावेत. विविध योजनांच्या भ्रष्टाचारातुन झालेल्या शासकीय निधीच्या अपहाराची भरपाई या सर्वांकडून करून घेण्यात यावी. ग्रामसेवक रविंद्र जगताप, विस्तार अधिकारी परदेशी आणि गटविकास अधिकारी यांच्या अंतर्गत प्रशासकीय चौकशी करून त्यांना निलंबित करावे. अशी मागणी या निवेदन करण्यात आली आहे लवकरात लवकर जिल्हाधिकारी यांनी कारवाई करावी असे अपेक्षा उपोषण करते करून करण्यात येत आहे

## हैद्राबाद मुक्तिसंग्राम म्हणजे मानवी मुक्तीचा लढा -प्रा. घाडगे




पाटोदा । प्रतिनिधी

हैद्राबादमधील निजामाची राजवट ही स्वार्थी व जुलमी राजवट होती. निजाम हा इंग्रजांचा मांडलिक होता व त्याने विशेषतः हिंदू जनतेवर अन्याय व अत्याचार केले म्हणूनच हैद्राबाद मुक्तिसंग्राम हा मानवी मुक्तीचाच लढा होता असे म्हणणे वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रा. डॉ. सोमनाथ घाडगे यांनी केले. येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनाच्या निमित्ताने आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या अतिथी व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे होते. व्यासपीठावर क. म. उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण होते. प्रास्ताविकात डॉ. प्रकाश फड यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी थोडक्यात विषद करत तात्कालीन संस्थानांचे विलीनीकरण व निजामाची अतिश्रीमंत राजवट यावर भाष्य केले. 'हैद्राबाद मुक्तीसंग्राम चळवळीतील महत्वाचे पैलू' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. सोमनाथ घाडगे यांनी निजाम राजवटीतील रझाकार संघटना, भारतीय स्टेट कॉंग्रेसची स्थापना, वंदे मातरम चळवळ, झेंडा सत्याग्रह तसेच हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढ्यातील मुख्य सेनानी यांच्या योगदानाबद्दल विश्लेषण करत चळवळीत अबाल वृद्धांनी कसा सहभाग घेतला याचा इतिहास डोळ्यासमोर मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जगन्नाथ पटाईत यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# सतीश घाटगे यांच्या प्रयत्नाला यश ; ३ हजार गरीब कुटुंबांना घरकुल मंजूर

जालना । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील प्रत्येक घटकातील गरीब कुटुंबांना पक्के घर देण्यासाठी सरकारकडून विविध प्रकारच्या घरकुल योजना राबविण्यात येतात. दलित कुटुंबासाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास आणि ओबीसी प्रवर्गातील गरीब कुटुंबासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेअंतर्गत घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील सुमारे ३००० गरीब कुटुंबांना घरकुल मंजूर करून देण्यात भाजप नेते सतीश घाटगे यांना यश आले आहे. दोन्ही योजनेतील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्यावतीने घरकुल मंजूर झाल्याचे पत्र देण्यात आले आहे.



सरकारचे आणि प्रशासनामुळे हे शक्य झाले -प्रत्येक गरिबाला पक्के घर देण्याचे ध्येय सरकारचे आहे. म्हणून गरीब कुटुंबासाठी निधीची तरतूद करून सर्वांना घरे देण्यासाठी घरकुल योजना मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. खऱ्या गरीब कुटुंबाला घरकुल मंजूर करून देता आले याचे समाधान आहे. सरकार आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांचे मी लाभार्थीच्या वतीने आभार मानतो.

– सतीश घाटगे विधानसभेचे उमेदवार

अनेक वर्षापासून घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील दलित कुटुंब तसेच ओबीसी प्रवर्गातील अनेक गरीब कुटुंब घरकुल योजनेपासून वंचित होते. या खऱ्या गरजू आणि गरीब कुटुंबांना हक्काचे घरकुल मिळवून देण्यासाठी सतीश घाटगे यांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर करून त्यांचा शासनाकडे पालकमंत्री अतुल सावे यांच्यामार्फत पाठपुरावा केला. अतुल सावे यांच्या सहकार्यातून व सतीश घाटगे पाटील यांच्या प्रयत्नामुळे घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील ३००० गरीब कुटुंबांना रमाई आवास व यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेतून घरकुल मंजूर झाले आहे. घरकुल मंजुर झालेल्या लाभार्थीना आनंद व्यक्त करत सतीश घाटगे व सरकारचे आभार मानले.

# लाडक्या बहिणीच्या मदतीसाठी बँक कर्मचारी संघटना सरसावल्या

परळी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सरकारने गोरगरीब महिलांसाठी लाडकी बहीण योजना जाहीर केली त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी बँक खाते असणे आवश्यक आहे म्हणून बँकांमधून महिलांची खूप जास्त गर्दी वाढली. बँकांची दैनंदिन कामे आणि अचानकपणाने होणारी महिलांची गर्दी यामुळे बँकांवर प्रचंड ताण वाढला परिणामी ग्राहक आणि बँक कमर्चारी यांच्यातील ताणतणाव वाढू लागले काही ठिकाणी तर बँकेच्या कमर्चाऱ्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न झाला. कामाचा ताण अचानक वाढला परंतु बँकेचा स्टाफ हा अचानक वाढवता येत नसल्यामुळे आहे त्या स्टाफ मध्ये ग्राहकांना सेवा देण्याचे काम सुरू होते परंतु कितीही प्रयत्न केले तरी दिलेल्या वेळेमध्ये ते काम पूर्ण होणे शक्य नव्हते म्हणून आणि शी संलग्न असलेल्या बँक कर्मचारी आणि अधिकारी संघटना यांनी एकत्रित येऊन बँक व्यवस्थापनास सुट्टीच्या दिवशी बँकेत जाऊन कामे



करू त्यासाठी बँक व्यवस्थापनाने सहकार्य करावे , अशी विनंती केली आणि ही शिल्लक कामे करून लाडकी बहीण योजेने संदर्भातील उघडावयाचे खाते असोत किंवा आधार, खात्याला जोडणे, त्याप्रमाणे बँकेच्या रेकॉर्ड वर त्याची (के वाय सी) नोंद घेणे यासाठी पुढाकार घेऊन कसल्याही प्रकारचा मोबदला न घेता सुट्टीच्या दिवशी आपापल्या शाखांमध्ये जाऊन बँक ऑफ महाराष्ट्च्या व या संघटनेच्या कमर्चारी / अधिकारी यांनी काम केले .संघटनेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेबद्दल बोलताना कॉ. उत्तम होळीकर म्हणाले ''बँकिंग सेवा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असला पाहिजे ''ही बँक कर्मचारी संघटनेची मागणी आहे आणि म्हणून राष्ट्रीयकृत बँका या फक्त श्रीमंत लोकांसाठीच नाही तर गोरगरीब जनतेसाठी सुद्धा सदैव तत्परतेने काम करत असतात आणि त्याचाच एक भाग म्हणून गोरगरीब महिला लाभार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने सुरू केलेली लाडकी बहीण योजना या योजनेपासून कोणीही वंचित राहू नये या योजनेचा सर्वांना वेळेत लाभ मिळावा म्हणून आम्ही बँक ऑफ महाराष्ट्रच्या ९० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आमच्या संघटनेच्या सभासदांना सुट्टीच्या दिवशी कसल्याही प्रकारचा मोबदला न घेता बँकेमध्ये जाऊन लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची शिल्लक असलेली उघडावयाची खाते उघडणे, त्यांच्या असलेल्या खात्याचे रिकेवायसीसी - केवायसी करणे अशा प्रकारचे कामे करण्यासाठी आवाहन केले आणि त्या आवाहनाला आमच्या संघटनेच्या सभासदांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला म्हणून दिनांक १४ सप्टें आणि २२ सप्टेंबर २०२४ रोजी बँकांना सुट्टी असूनही आमच्या आणि संघटनेच्या सभासदांनी बँक ऑफ महाराष्ट्राच्या संपूर्ण मराठवाडा विभागातील विविध शाखांमध्ये जाऊन लाडकी बहीण लाभार्थी योजनेची अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे जी संबंधित कामे अपूर्ण राहून गेली होती ती पूर्ण केली.



## विपुल पिंगळे यांची मराठवाडा निरीक्षकपदी निवड

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या विनंतीनुसार विपुल पिंगळे पाटील यांची शिवसेना युवासेना मराठवाडा विभागपदी नियुक्ती करण्यात आली

बीड शहरातून एका सामान्य कार्यकर्त्याची दखल घेत काही दिवसांपूर्वीच विपुल पिंगळे यांच्या वर पक्षाने युवासेना कार्यकारिणी सदस्य पदाची जबाबदारी दिली होती ती चोकपणे पार पाडत असताना आज त्यांच्यावर संपुर्ण मराठवाडा विभागाची जबाबदारी देण्यात आली तसेच शिवसेनेच्या सर्व पदाधिकार्यांचे व शिवसेना मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ श्रीकांत शिंदे तसेच युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांचे विपुल पिंगळे पाटील यांनी आभार मानले

# भक्ती कन्स्ट्रक्शन येथील होम मिनिस्टर कार्यक्रमाने गर्दीचा उच्चांक मोडला

बीड । प्रतिनिधी

गेल्या नऊ दिवसापासून सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची लोकप्रियता महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात झाली आहे. मीच पैठणी जिंकणार या आत्मविश्वासाने महिला या कार्यक्रमात हिरीरीने सहभागी होत आहेत.भक्ती कन्ट्रक्शन विश्वेश्वर मंदिर प्रभाग क्रमांक ११ या कार्यक्रमात महिलांच्या सहभागाचा उच्चांक निर्माण झाला.



काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या कार्यक्रमाची लोकप्रियता शिगेला पोहोचली आहे. हजारोच्या संख्येने महिला या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन मंगल प्रभाकर कवठेकर सुवर्णा राजेश पिंगळे, रेणुका मुकुंद भालेकर,महिला आघाडीच्या अध्यक्ष जयश्री विधाते, माजी सभापती उषा सरवदे, प्रेमलता चांदणे, किर्ती पांगारकर साळुंके, भारती राजेश क्षीरसागर अंजली पांगारकर, पूजा अमित चव्हाण काशीबाई सुधाकर उनवणे, रेणुका प्रकाश ढाकणे, कविता गणेशराव देशमुख, शांता जालिंदर पैठणे आदी मान्यवर महिलांची उपस्थितीत पारपडले. याप्रसंगी राजाभाऊ पिंगळे, गणेशजी देशमुख, सुधाकर उनवणे, गोपाळरावजी नाईक, संजय वाघमारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थित होती. होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे . १८ सप्टेंबर २०२४ ते ४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सुरू असलेल्या कार्यक्रमाने दिवसेंदिवस गर्दीचे उच्चांक मोडले आहेत .कालच्या कार्यक्रमापेक्षा उद्याचा कार्यक्रम अधिक भरभच्च आणि लोकप्रिय होत आहे. याचे सर्व श्रेय काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित आणि जयदत्त अण्णा क्षीरसागर महिला आघाडी विचारमंच यांच्या सूत्रबद्ध नियोजनातून ही स्पर्धा दिवसेंदिवस लोकप्रियतेचे शिखर काबीज करीत आहे. या कार्यक्रत भाग्यवान मानाच्या पैठणीची विजेती जनाबाई कैलास काळे, द्वितीय इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी विजेत्या रोहिणी निखिल सुपेकर . तर तृतीय विजेत्या चौरंगाच्या मानकरी प्रतिमा विजय मोरे या ठरल्या आहेत.तर उर्वरित सात महिलांना गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.यामध्ये सौ. वैशाली सुहास पुरंदरे, प्रतिमा विश्वनाथ भवर , मीना अभिमन्यू माने, मीनाक्षी राजेंद्र गाडेकर, प्रणिता जीवन सूर्यवंशी, आश्विनी आनंद जोशी या मानकरी ठरल्या कार्यक्रमात बक्षिसाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या सर्व महिलांची ७ ऑक्टोबर रोजी बीएच.एम.एस. कॉलेज येथे होणाऱ्या खेळ पैठणीचा महाराष्ट्रातील प्रसिद्ध क्रांती नाना माळेगावकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे .यासाठी सर्व महिलांची निवड झाली आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचाचे सर्व नगरसेवक कार्यकर्ते यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला. जवळपास साडेतीन तास महिलांना खेळवत कार्यक्रमात आनंदाचे नवरंग भरण्याचे काम महाराष्ट्रतील सुप्रसिद्ध निवेदक सुरेशभाऊजी अर्थात निवेदक सुरेश साळुंकेंनी केले .या कार्यक्रमास महिलांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

## शहरातील नालीची साफसफाई करा- नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील काझी नगर बालेपीर या ठिकाणी भरपूर लोकसंख्या आहे तरी त्या ठिकाणी आज पर्यंत रस्ता बनवण्यात आला नाही. नाल्या साप केल्या जात नाहीत व त्या ठिकाणी पथदिवे सुद्धा लावले जात नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून ज्यांची सत्ता आहे त्यांनी काय दिवे लावलेत हे यामधून निदर्शनास येत आहे सत्ता परिवर्तन होणे काळाची गरज आहे तोपर्यंत सर्वसामान्यांचे अडी अडचणी व जनसामान्यांचे प्रश्न सुटणार नाहीत.

काझी नगर बालेपिर या ठिकाणी पावसामुळे रस्त्यावर पूर्णपणे चिखल झालेला आहे व नाली साफ न केल्यामुळे नाली मधील सर्व घाण व पाणी हे रस्त्यावर येत आहे त्यामुळे तेथील नागरिकांना रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून त्या ठिकाणी रोडवर मुरूम टाकने व नाली साफ करणे पथदिवे लावावेत नगरपरिषद यांना ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने निवेदन देऊन विनंती करण्यात आली आहे चार दिवसाच्या आत त्यांनी आमची मागणी मान्य जर नाही केली तर तेथील घाण नगर परिषद सिओ यांच्या केबिनमध्ये टाकून ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्ह्याच्या वतीने आंदोलन केले जाईल याची प्रशासनाने दखल घ्यावी.

# अनिल जगताप यांच्या संकल्पनेतून होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन

## सर्व सहभागी महिलांना आकर्षक भेटवस्तू!

बीड । प्रतिनिधी

बीडच्या संस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपले सर्वोपरी योगदान देणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या संकल्पना मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला-भगिनींच्या अंगी असलेल्या कलागुणांना दर्जेदार व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ६.०० वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे अमोल जाधव यांच्या वतीने भव्य दिव्य होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून विजेत्या महिलांना आकर्षक



बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्या महिलेस फ्रिज, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन महिलांना प्रत्येकी १ एलसीडी टीव्ही असे दोन एलसीडी टीव्ही, तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या तीन महिलांना प्रत्येकी १ शिलाई मशीन अशा तीन शिलाई मशीन व त्यानंतर पुढील २१ विजेत्या महिलांना प्रत्येक १ पैठणी अशा २१ पैठणी साडी बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. याबरोबरच होम मिनिस्टर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला संसार उपयोगी आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वतः महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीडमधील महिला-भगिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे येऊन आपल्या नाव नोंदणी करावी अथवा योगेश सारूक : ९१३२७३७४७५, अक्षय जगताप : ९७३०३७२२२२, नवनाथ बोबडे : ७०३०५६२५९०, दत्ता ताटे : ९५९५४३४४०५, लक्ष्मीकांत दोडके : ९९२२८३९७५३ यांच्याशी संपर्क साधून ऑनलाईन नाव नोंदणी करावी.

### महिला-भगिनींनी सहभागी व्हावे-जगताप

बीडमधील महिला-भगिनींच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता माझे सहकारी अमोल जाधव यांच्या माध्यमातून होममिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे दि. ५ ऑक्टोबर रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे सायं ६.०० वाजता भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे. फ्रिज, एलसीडी टीव्ही, शिलाई मशीन, पैठणी साडी तसेच संसार उपयोगी असणाऱ्या भेटवस्तू देखील सहभागी महिलां-भगिनींना देण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील हे स्वतः उपस्थित राहणार असून पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ते स्वतः करणार आहेत. रोजच्या दैनंदिन व्यापातून स्वतःसाठी थोडासा वेळ काढून बीड शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## उपवर्गीकरण अटीच्या निर्णयाविरोधात निळं वादळ धडकणार

घनसावंगी । प्रतिनिधी

एससी एसटी च्या उपवर्गीकरण व क्रिमिलीयर अटीच्या खंडपिठाने दिलेल्या निर्णय तातडीने रद्द करावा या मागणीसाठी सकल बौद्ध समाजाच्या वतीने दि ७ ऑक्टोबर सोमवार रोजी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असून याविषयीचे निवेदन तहसीलदार व पोलीस निरीक्षक घनसावंगी यांना देण्यात आले आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ६/१ उप वर्गीकरणाचा निर्णय संविधानात तरतूद नसताना घेतला आहे. हा निर्णय एससी एसटी समूहातील वर्गाला आपअपसात विभागणी करून मोठ्या प्रमाणात वाद निर्माण करण्यास प्रवृत्त करत आहे तसेच एस सी उपवर्गीकरणाची मागणी या जातीने कधीच केली नसताना तो निर्णय पारित



केला आहे. त्यामुळे हा निर्णय तात्काळ रद्द करावा या मागणीसाठी दि ७ ऑक्टोबर सोमवार रोजी घनसावंगी तहसील कार्यलयावर हे निळं वादळ धडकणार असून या विषयीचे निवेदन सकल बौद्ध समाजाच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले आहे.हा मोर्चा बस स्टॅन्ड ते तहसील कार्यलय पर्यंत असणार आहे त्यामुळे जास्तीस जास्त समाज बांधवांनी या मोर्चास सहभागी व्हावे असं आव्हान करण्यात येत आहे.

# पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला सोयाबीनला आले कोंब तर कापसाच्या झाल्या वाती

## लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावी अन्यथा संघर्ष तीव्र करणार -कॉ. अजय बुरांडे

**परळी । प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून बीड जिल्ह्यात पावसाने पुन्हा थैमान घातले आहे. यामुळे पावसामुळे हाहाकार माजला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला. सोयाबीनच्या शेंगांची गळती होऊन वेचणीस आलेल्या कापसाच्या वाती झाल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे. परळी तालुक्यातील मौजे बोरखेड व ममदापूर शिवारातील शेतकऱ्याच्या शेतामध्ये जाऊन उभ्या पिकाच्या झालेल्या नुकसानीची पाहणी किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष कॉ. अजय बुरांडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी केली.

पावसामुळे नद्या, नाले, ओढे खळाळले असून नदीला आलेल्या पुरामुळे, बीड परळी व परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावरील बाहतूक पुन्हा ठप्प झाली आहे. परळी बीड रस्त्यावरील वान नदीला आलेल्या पुरामुळे तात्पुरता पर्यायी पूल दुसऱ्यांदा वाहून गेला. तर परळी गंगाखेड मार्गावरील पुलाच्या अर्धवट कामामुळे पुन्हा तिसऱ्यांदा वाहतूक ठप्प झाली आहे. दरम्यान, सध्या सोयाबीन,



कापूस शेतकऱ्यांच्या शेतात उभे असून सोयाबीन काढणीसाठी आले आहे. जोरदार पडलेल्या पावसामुळे सोयाबीनच्या शेंगांना गळती लागली तर वेचणीसाठी आलेला कापसाच्या पावसामुळे वाती झाल्या आहेत. १५ दिवसांपूर्वी अतिवृष्टी झाली होती. त्याचेच पंचनामे पूर्ण झाले नाहीत तर आता पुन्हा शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पहिलीच नुकसान भरपाई मिळाली नाही. आता दुसऱ्यांदा पडलेल्या पावसाने शेतकरी हवालदिल झाला आहे. पहिलेच



पंचनामे अर्धवट असताना या आहे. नुकसानीचे पंचनामे कधी करणार? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. शेतकऱ्यांच्या नशीबी कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ. यामुळे शेतकरी पुरता मेटाकुटीला आला आहे. मागच्या वर्षीचा भावातील फरक म्हणून पाच हजार रुपये शासनाने फरक देण्याचे घोषित केली आहे ते मिळाले नाहीत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई मिळाली नाही. आता हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. याकडे सरकारने लक्ष देवून लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे. याप्रसंगी किसान सभेचे कॉ. बाबासाहेब बडे, दत्तात्रय गव्हाणे, जालिंदर गव्हाणे, बालाजी कडबाने आदिसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

### ...तर संघर्ष तीव्र करणार - कॉ.अजय बुरांडे

**परतीच्या मान्सून मध्ये झालेल्या अतिवृष्टीत शेतकऱ्यांच्या कापूस आणि सोयाबीन पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेला घास अतिवृष्टीमुळे निसर्गाने हिरावून घेतला. यामुळे एकीकडे आसमानी संकटाशी सामना करणारा बळीराजा दुसरीकडे शासन आणि प्रशासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे सुलतानीच्या कचाट्यात सापडला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वेळेत मदत करावी अन्यथा किसान सभेच्या वतीने येत्या भविष्यकाळात तीव्र आंदोलन करण्यात येईल, या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी आणि शेतमजुरांना एकत्र घेऊन शासनासोबत आम्हाला संघर्ष करावा लागेल अशी प्रतिक्रिया किसान सभेचे जिल्हाध्यक्ष काँ.अजय बुरांडे यांनी दिली.**



**बीड : सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी सत्कार केला. यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर,डॉ. तांदळे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी वसुदेव मिसाळ यांचे पदोन्नती बद्दल अभिनंदन केले. बीड जिल्ह्यातील जवळपास ३५ सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकांची बढती होवून त्यांना पोलीस उपनिरीक्षकाचा दर्जा देण्यात आला आहे.**

# घशातील पैंजण काढून डॉ.गीते यांनी मुलीचे प्राण वाचवले

## परळीच्या जीवन हॉस्पिटलमध्ये झाली शास्त्रक्रिया

बीड । प्रतिनिधी

परळी येथील जीवन हॉस्पिटलमध्ये एका तीन वर्षे वयाच्या मुलीच्या घशात अडकलेला ,पायातील पैंजण बाहेर काढून तीन वर्षाच्या मुलीचे प्राण वाचवण्याचे काम जीवन हॉस्पिटलचे डॉ.मंगेश गीते यांनी केले. त्यांना भूलतज्ञ डॉ.शुभांगी फड यांनी तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांनी साथ दिली. या मुलीचे प्राण वाचल्याने तिच्या आई-वडिलांनी डॉक्टरांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आशीर्वाद दिले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी येथील आजिबात सय्यद ही तीन वर्षाची मुलगी खेळत असताना तिच्या घशामध्ये पायातील पैंजण अडकले. त्यामुळे तिला स्वासोच्छवास घेण्यास त्रास सुरू झाला. या मुलीची परिस्थिती गंभीर होती. यात तिचे प्राणही जाऊ शकले असते.परंतु जीवन हॉस्पिटलचे डॉ. मंगेश गीते यांनी समय सूचकता दाखवून तात्काळ या मुलीला ऑपरेशन थिएटर मध्ये नेले व कुठलाही वेळ न जाऊ देता या मुलीचे यशस्वी ऑपरेशन करून या मुलीच्या घशातील पैंजण बाहेर काढला. त्यांना भूलतज्ञ डॉ. शुभांगी फड यांनी मोलाची साथ दिली. मुलगी खेळत असताना हे पैंजण घशात अडकले होते . त्याचे हुक घशाच्या टॉन्सिल मध्ये अडकून बसले.त्यामुळे या मुलीचे प्राण जाऊ शकले असते.

मात्र डॉक्टरांनी सिताफीचे प्रयत्न करून या मुलीचे प्राण वाचवले.या यशस्वी शस्त्रक्रियेचे सर्व परळी शहरात कौतुक होत आहे. डॉ.मंगेश गीते बीड जिल्हा वाहतूक शाखेचे कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांचे जावई आहेत. त्यांनी या मुलीचे प्राण वाचवल्याबद्दल



तिच्या आई-वडिलांनी त्यांना लाख लाख धन्यवाद दिले या कामी जीवन हॉस्पिटलच्या सर्व सहकाऱ्यांनी मदत केली.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात इन्क्युबेशन सेंटरला मान्यता

**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात इन्क्युबेशन सेंटरला मान्यता मिळाली आहे.

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत विविध उद्योग व व्यवसायांना चालना देण्यासाठी इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून नवनवीन उद्योगविषयक संकल्पना प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी मूलभूत सुविधा व मार्गदर्शन दिले जाते. नवीन उद्योग, व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी, माजी विद्यार्थी व नागरिक यांना इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून शासनामार्फत अर्थसहाय्य दिले जाते व उद्योजकता विकासास चालना दिली जाते.

वसंतदादा पाटील महाविद्यालयात उपलब्ध पायाभूत संशोधनविषयक सुविधा व मार्गदर्शन विचारात घेऊन इन्क्युबेशन सेंटर सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तरी युवकांनी आपल्या नवीन उद्योगासंबंधी संकल्पना लवकरात लवकर महाविद्यालयास कळवाव्यात असे आवाहन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे (९४२१६३०९१०), उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर (८६००१५६३१०), प्रो. गणेश पाचकोरे (९८५०१६८२८२) व डॉ. ज्ञानेश्वर चौधरी (९८८१५१०८०८) यांच्याशी संपर्क साधावा.

# स्वा.रा.ती. रुग्णालयाच्या सर्व समस्या सोडविणार - खा.डॉ.अजित गोपछडे

## कर्करोग निदान व अतिदक्षता रुग्णालयासाठी प्रयत्न करणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माझं पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण स्वा.रा.ती. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील समस्या मोठ्या प्रमाणात आहेत विद्यार्थ्यांची संख्या ५० वरुन १५० झाली. परंतू, मनुष्यबळ आहे तितकेच आहे. राज्यसभेचा खासदार या नात्याने येणाऱ्या काळात हे चित्र नक्कीच आपल्याला बदलेलं दिसेल, यासाठी मी केंद्राकडे आणि राज्य सरकारकडे माझी प्रतिष्ठा पणाला लावेल, असे मत राज्यसभेचे खा. डॉ.अजित गोपछडे यांनी व्यक्त केले

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय आढावा बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

खा.डॉ.गोपछडे पुढे बोलताना म्हणाले की, स्वा.रा.ती.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाला



स्थापन होऊन ५० वर्षे होत आहे.वैद्यकीय महाविद्यालयाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या समस्या सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. हा निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी मी केंद्रीय ◀◀ पान ३ वर

# सकल नाभिक समाजाचे महाधरणे आंदोलन

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

नाभिक समाजासाठीचे संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ कार्यान्वीत करा या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्रातील सकल नाभिक समाज दि.३० सप्टेंबर रोजी सोमवारी आझाद मैदान मुंबई येथे एकदिवसीय राज्यव्यापी महाधरणे आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधून घेणार असल्याची माहिती किरण भांगे यांनी दिली.

शासनाकडे दिलेल्या निवेदनात केशशिल्पी महामंडळास १००० कोटी रुपयांचा निधी द्यावा, उपकंपनीचे मुंबई मुख्यालयातील बारा प्रशासकीय

### संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ कार्यान्वीत करा

अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी शासनाने जाहिरात काढावी व संचालक मंडळातील अध्यक्ष,उपाध्यक्ष,शासकीय सदस्य यांच्या निवडी कराव्यात,थेट कर्ज योजनेतील सिबिल व जामीनदारांची जाचक अट शिथिल करावी, उपकंपनीचे लेटरहेड,कार्यालय,माहितीपत्रक यांचेवर सेना महाराजांचा फोटो वापरावा या आंदोलनाच्या प्रमुख मागण्या आहेत.

१३ सप्टेंबर १९ रोजी स्थापन ◀◀ पान ३ वर

### श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचा दुर्गोसव यावर्षी साधारणपणे

# माझ्या दादांच्या निधनामुळे जाहिर कार्यक्रम घेवु शकत नाही -कराड

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरात दुर्गा उत्सवाची परंपरा सुरु करणारे भगवान सेनेचे सरसेनापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते फुलचंद कराड यांच्या श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचा दुर्गोसव यावर्षी साधारणपणे साजरा होणार असुन माझा मुलगा राजपान याच्या निधनामुळे वर्षभर दुःख पाळावे लागते.यामुळे यावर्षीच्या दुर्गोत्सवात सांस्कृतिक व करमणुकीचे कार्यक्रम घेता येणार नाहीत हे भाविकांनी समजुन घ्यावे असे आवाहन फुलचंद कराड यांनी केले आहे.



श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान परळीच्या माध्यमातुन भगवान सेनेचे सरसेनापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते फुलचंद कराड हे नवरात्रोत्सवात भक्ती,समाजप्रबोधन,करमणूक अप्सरा आली,जागर कुलस्वामिनीचा,लावण्य तारका, भीम गीते,मेलडी आर्केस्ट्रा

कीर्तन,कव्वाली मुकाबला अशा दर्जेदार कार्यक्रमांची परळीकरांना मेजवानी देत असतात.फुलचंद कराड यांचे चिरंजीव राजपान यांचे निधन झाल्यामुळे वर्षभर कुठलेही कार्यक्रम घेता येत नाहीत.राजपान दादांचे दि.१९ ऑक्टोबर रोजी वर्षश्राध्द आहे.यामुळे यावर्षीच्या दुर्गोत्सवात होणारे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आल्याची माहिती कराड यांनी दिली.माझ्या वाट्याला आलेले दुःख इतर कोणाच्याही वाट्याला येऊ नये मी या दुःखातुन सावरत असुन आता समाजाची सेवा करणे हाच जीवनाचा उद्देश आहे.यामुळे भाविक व नागरीकांनी मला समजुन घ्यावे असे आवाहन फुलचंद कराड यांनी केले आहे.

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सोशल मिडियापासून सावध रहावे - पोनि सय्यद

पाटोदा । प्रतिनिधी

आजकाल सोशल मिडियाचा गैरवापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. विशेषतः महाविद्यालयीन युवतींनी आपली माहिती अथवा छायाचित्रे फेसबुक, इंस्टाग्राम या सारख्या माध्यमांवर पाठवू नयेत जेणेकरून तुमच्या माहितीचा गैरवापर टाळता येईल असे प्रतिपादन पाटोदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक मा. सय्यद मजहर यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्थेच्या वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २७ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर



उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, क. म. उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा.या निल जोगदंड उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वप्रथम राष्ट्रीय सेवा योजनेचे जनक महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये कार्यरत कार्यक्रमाधिकारी व सहकारी प्राध्यापकांचा अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शिस्तपालन समितीच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर व्याख्यानात सय्यद मजहर पुढे म्हणाले की, महाविद्यालयीन युवकांनी इंटरनेटचा वापर आपल्या ज्ञानात वाढ करण्यासाठी करावा. सोशल मिडियामध्ये वेळ घालवू नये. पालकांनी ज्या उद्देशाने शिक्षण घेण्यासाठी पाठवले आहे तो उद्देश सफल करावा. शिस्तपालन विषयी ते म्हणाले की, वाहनचालन परवाना नसताना युवकांनी वाहने चालवू नयेत. मुलींच्या छेडछाडीच्या संदर्भातील तक्रारी तात्काळ पोलीस विभागाला कळवाव्यात. ◀◀ पान ३ वर

# पर्यावरण संवर्धनासाठी महिला सरसावल्या

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनासाठी व अंबाजोगाई शहरातील प्लास्टिक कमी करण्यासाठी महिला सरसावल्या आहेत.

प्रभागातील महिलांशी संपर्क करून व शाळांमधील मुलांच्या माध्यमाने सागर मित्राची स्वच्छ व कोरडे प्लास्टिक जमा करण्याची संकल्पना रुजवून घराघरातील प्लास्टिक गोळा केले आहे यासाठी भगीनी निवेदिता गटातील सदस्यांनी शाळांमध्ये जाऊन मुलांना प्लास्टिक गोळा करून ठराविक दिवशी शाळेत आणण्याचे आवाहन करत असून या कार्यासाठी अंबाजोगाई नगर परिषदेचे स्वच्छता विभागाचे कर्मचारी सहकार्य करत आहेत. या गटातील दीपाली माहोरकर,डॉ.शुभदा लोहिया, डॉ.गौरी कुलकर्णी,डॉ.नयन देशमुख, डॉ.प्रिया मुळे, तिलोत्तमा पतकराव,मनीषा वालेकर ,डॉ.सीमा लोमटे,प्रतिभा अष्टपुत्रे,सारिका गुंडरे,उमा दिक्षित,सविता लोमटे यांनी जमा केलेले



## प्लास्टिकचे रिसायकलिंग

कोरडा प्लास्टिक कचरा रिसायकल करण्यासाठी पाठवले आहे हे कार्य असेच पुढे चालू ठेवायचे आहे यासाठी आपापल्या घरी कोरडे प्लास्टिक जमा करून ठेवल्यास घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्यामुळे जास्तीत जास्त शाळा व नागरिकांनी यात आपला सहभाग द्यावा व सहकार्य करावे असे आवाहन या गटातील सदस्यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मेट्रो उद्घाटनावरून राजकारण तापलं

## विरोधकांना राजकारण कशाचं करावं हे कळत नाही– केंद्रीय मंत्री मोहोळ

**पुणे । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा (दि.२६) नियोजित पुणे दौरा रद्द झाल्याने राजकारण तापल्याचं पाहायला मिळालं. मोदींच्या हस्ते स्वारगेट ते जिल्हा न्यायालय या मेट्रोच्या विस्तारित मार्गाचे उद्घाटन करण्यात येणार होते. पाऊस आणि कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात चिखल झाल्याने पंतप्रधान मोदींचा नियोजित पुणे दौरा रद्द करण्यात आला.

आता राजकारण बाजूला ठेवून मेट्रोचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करून शिवाजीनगर ते स्वारगेट हा भुयारी मेट्रो मार्ग नागरिकांसाठी खुला करावा आणि पुन्हा एकदा कार्यक्रम घेऊन लोकांच्या पैशाचा चुराडा करू नये, अशी मागणी विरोधकांकडून करण्यात आली. दरम्यान आज (दि.२७) विरोधकांकडून या मुद्यावरून आंदोलन करण्यात आले. या सर्व बाबींवरून केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, पाऊस असल्याने कार्यक्रम रद्द केला. कार्यक्रम झाला असता तर वाहतूक प्रश्न वाढला असता, नागरिकांना त्रास झाला असता, नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी म्हणून कार्यक्रम रद्द केला.



पुण्यात नवीन मेट्रो मार्गाला परवानगी मिळेल, मेट्रोचं जाळं वाढवण्याचा आमचा प्रयत्न आहे. राजकारण कशाच करावं हे विरोधकांना कळत नाही. त्यांच्या काळात विरोधकांनी काय केलं? असा प्रश्न उपस्थित करत पुणेकरांना सगळ समजतं असेही मोहोळ यांनी म्हंटले.

ते पुढे म्हणाले, सरकारी कार्यक्रम आहे. सुरक्षा महत्वाची आहे. खर्च होतो आणि झाला आहे. परंतु, निसर्गाबद्दल कुणाच्या काही हातात नाही. पावसाची शक्यता नसती तर कार्यक्रम झाला असता. प्रत्येक टप्प्याला मोदी का असा प्रश्न विचारला जातोय. पण असंच मेट्रो जगात सुरू होते.

निवडणुकीत काय होतं हे लोकसभेला लोकांनी दाखवले आहे. किती तरी नेते कोरोना काळात दिसले नाहीत, पुणे मेट्रोला विरोध करणारे आता मेट्रो उद्घाटन करत आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते (दि.२९) रोजी ऑनलाईन पद्धतीने मेट्रो उद्घाटन व विविध विकास कामांचा उद्घाटन व भूमिपूजन होणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री या कार्यक्रमाला उपस्थितीत राहणार आहेत. गणेश कला क्रीडा मैदान येथे हा कार्यक्रम होणार आहे अशी माहिती मोहोळ यांनी दिली आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून केली फसवणूक : तरुणावर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीबरोबर शारीरीक संबंध ठेवले. त्यातून ती गर्भवती राहिल्यावर तिला जबरदस्तीने गर्भपात करायला भाग पाडले. त्यानंतर लग्नास नकार देऊन फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे.ङ्गयाप्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील एका ३३ वर्षाच्या तरुणीने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी शाफिक जाबीर शेख (वय ३३, रा. मोगल मशीद, मुंबई) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २५ डिसेंबर २०२१ ते २४ जून २०२४ दरम्यान कोरेगाव पार्क येथील हॉटेल शनशाईन येथे घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि आरोपी हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. शफिक शेख याने फिर्यादींना लग्नाचे आमिष दाखवून त्यांच्याशी शारीरीक संबंध ठेवले. त्यातून फिर्यादी या गर्भवती राहिल्या. तेव्हा त्याने फिर्यादींना गर्भपात करण्यास सांगितले. त्याला त्यांनी नकार दिला. तेव्हा शफिक शेख याने शिवीगाळ करुन त्यांच्या नातेवाईकांला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तेव्हा घाबरुन आरोपीने पाठविलेले गर्भपाताचे औषध घेऊन गर्भपात केला. आरोपीने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन वारंवार शारीरीक संबंध प्रस्थापित केले. फिर्यादी यांनी लग्नाबाबत विचारले असता त्याने लग्नास नकार दिला. त्यानंतर फिर्यादी यांनी पोलिसांकडे तक्रार दिली असून पोलीस उपनिरीक्षक गायकवाड तपास करीत आहेत.

# जमिनीच्या वादातून झालेल्या दुहेरी हत्याकांडातील ७ आरोपींना जन्मठेप

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

जमिनीच्या वादातून दोघाना पळवून नेऊन आडरानात लाकडी दांडकी आणि दगडाने ठेचून खून करणाऱ्या ९ पैकी ७ आरोपींना राजगुरुनगर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी शुक्रवारी (दि २७) जन्मठेपेची शिक्षा सुनावली. एका आरोपीचा मृत्यू झाला असून एक अल्पवयीन आहे. माण (ता. मुळशी) येथील जमिनीच्या वादातून चाकण जवळच्या पिंपरी खुर्द हद्दीत ११ जुलै २००९ रोजी भर दुपारी ही दुहेरी खुनाची खळबळजनक घटना घडली होती.

रोहिदास उर्फ गणपत उर्फ बाळू जयसिंग ठाकर (वय ३९, मयत), राजु जयसिंग ठाकर (वय ३६), संतोष जयसिंग ठाकर (वय २४), प्रितम उर्फ रोड्या पंडीत ठाकर (वय १९), जगदीश उर्फ गोट्या शिवाजी ठाकर (वय २१), चंद्रशेखर शिवाजी ठाकर (वय १९), तुषार प्रल्हाद ठाकर (वय १९) आणि रघुनाथ दामू पारखी (वय ५७, सर्व रा. माण, ता. मुळशी) अशी जन्मठेप झालेल्या आरोपींची नावे आहेत. या घटनेत पंढरीनाथ सदाशिव पारखी (वय ६०) आणि चंद्रकांत उर्फ पप्पु ज्ञानोबा पारखी (वय ३७) या दोघांचा खून करण्यात आला होता.माण गावात वास्तव्य असलेली ही दोन कुटुंब आहेत. मयत चंद्रकांत उर्फ पप्पु पारखी याने खरेदी केलेली ७३ गुंठे जमीन मयत आरोपी रोहिदास ठाकर याला विक्रीच्या हेतूने साठेखत करून दिली होती. रोहिदास याला मुदतीत हा व्यवहार पूर्ण करता आला नाही. त्यावरुन पुणे न्यायालयात वाद सुरू होता. न्यायालयाने खून झालेल्या पारखी याच्या बाजूने निकाल दिला होता. त्याचा राग ठाकर परिवाराला होता. घटनेच्या दिवशी मयत चंद्रकांत आणि चुलते पंढरीनाथ हे चाकण शेळी बाजारात चारचाकी वाहनाने शेळ्या विक्रीसाठी आले होते. त्यांच्यासोबत आरोपी झालेले रघुनाथ पारखी हेही होते. पुढे याच आरोपीने खुनाचा कट रचल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. बाजारातील काम उरकल्यावर चाकण ते रोहकल रस्त्यावर असलेल्या मयत पंढरीनाथ पारखी यांच्या मुलीकडे तिघेजण थांबले. तेथून बाहेर पडले तेव्हा काही अंतरावर आरोपींनी त्यांना गाठले. जबरदस्तीने पिंपरी खुर्दच्या आडरानात नेऊन सर्वांनी दोघांवर लाकडी दांडकी आणि दगडांनी हल्ला केला. कुणालाही घटनेचा थांगपत्ता लागू नये, यासाठी पुरावे नष्ट केले. मयत पंढरीनाथ यांचा मुलगा संदीप पारखी याने चाकण पोलिसात फिर्याद दिली होती. दोन परिवारातील वाद माण परिसरात माहिती असताना देखील सुरुवातीला वेगळ्याच आरोपींना अटक झाली होती; मात्र हा तपास पुढे सीआयडीकडे देण्यात आला. पोलिस निरिक्षक दिपाली घाडगे यांच्या पथकाने नेमके आरोपी शोधून काढले. आरोपींना अटक करण्यात आली. ते दोन वर्षांनी जामिनावर बाहेर पडले. २०१४ मध्ये राजगुरुनगर न्यायालयात हा खटला सुरू झाला. महाराष्ट्र राज्याचे विशेष सरकारी वकील ड. विजय सावंत यांनी खून झालेल्या पारखी यांची बाजु न्यायालयात मांडली. एकुण २० साक्षीदार तपासण्यात आले. साक्ष आणि पुराव्यांनुसार निर्दयीपणे खून करणाऱ्या आरोपींना न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी जन्मठेप, दोन हजार रुपये दंड, अपहरण व कट कारस्थान यासाठी ५ वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली. चाकण पोलिस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद वाघ यांनी तपास काम पाहिले.

# तिघा चोरट्यांकडून तब्बल २० दुचाकी जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

सराईत तिघा चोरट्यांना पकडून त्यांच्याकडून कोंढवा पोलिसांनी तब्बल २० दुचाकी जप्त केल्या आहेत. आंध्र प्रदेशातून चोरी केलेली एक दुचाकीही त्यांच्याकडे मिळाली आहे. २ बुलेट, ६ स्प्लेंडर, ३ ॲक्टिव्हा, १ ज्युपिटर २ शाईन, १ ड्रिम युगा, ३ पॅशन, २ एच एफ डिलक्स अशा वेगवेगळ्या दुचाकी त्यांनी चोरल्या होत्या. या गाड्यांना ग्राहक मिळेपर्यंत त्या वेगवेगळ्या ठिकाणी लपवून ठेवल्या होत्या.




गौस मिरासाहब शेख (वय २०, रा. बावलगाव, ता. औराद, जि. बिदर, कर्नाटक सध्या रा. हांडेवाडी), शाहरुख कासीम शेख (वय २५, मुळ रा. गुंडपंत, दापका, ता. मुखेड, जि. नांदेड, सध्या रा. हांडेवाडी) आणि जुबेर अहमद मंगरुळे (वय २९, रा. गुंडपंत दापका, ता. मुखेड, जि. नांदेड, सध्या रा. शिवनगरी पार्क, दिघी, भोसरी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

वाढत्या वाहन चोरीच्या घटनांमुळे पेट्रोलिंग करुन सीसीटीव्ही फुटेज तपासून गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर यांनी दिल्या होत्या. तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे, पोलीस अंमलदार संतोष बनसुडे, सागर भोसले हे सीसीटीव्ही फुटेज तपासणी करत होते. तसेच पोलीस हवालदार निलेश देसाई त्यांनी सीसीटीव्ही फुटेज प्राप्त ठिकाणाचे तांत्रिक विश्लेषण करुन संशयित वाहन चोरीचे आरोपी निष्पन्न केले. हे संशयित आरोपी ध्रुव ग्लोबल स्कुलचे मागील बाजूस मोकळया ठिकाणी नेहमी येत असल्याबाबतची गुप्त माहिती प्राप्त झाली.

पोलीस अंमलदार सतिश चव्हाण, निलेश देसाई, विशाल मेमाणे, संतोष बनसुडे, सागर भोसले, शाहिद शेख, सुरज शुक्ला, सुजित मदन यांनी दोन पथके तयार करुन त्या ठिकाणी गेले. तेव्हा तेथे लागलेल्या दुचाकीवर तिघे जण गप्पा मारत बसलेले दिसून आले. पोलिसांनी त्यांना पकडून पोलीस ठाण्यात आणले. त्यांना पोलीसी खाक्या दाखविल्यावर त्यांनी वाहन चोरीची कबुली दिली. त्यांनी वेगवेगळ्या २० दुचाकी चोरल्या असल्याचे सांगितले. वेगवेगळ्या ठिकाणी लपवून ठेवलेल्या ७ लाख ३० हजार रुपयांच्या २० दुचाकी जप्त करण्यात आल्या. त्यातून कोंढव्यामधील ९, हडपसरमधील २, भारती विद्यापीठमधील २ तसेच वानवडी, मुंढवा, लोणीकंद, यवत, चिखली, चिंचवड या पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एक असे २० गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा,, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त आर राजा, सहायक पोलीस आयुक्त धन्यकुमार गोडसे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, गुन्हे निरीक्षक मानसिंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे, पोलीस अंमलदार सतिश चव्हाण, निलेश देसाई, विशाल मेमाणे, गोरखनाथ चिनके, सागर भोसले, संतोष बनसुडे, शाहीद शेख, लक्ष्मण होळकर, सुरज शुक्ला, सुजित मदन या पथकाने केली आहे.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात रक्तदान शिबिर

## अभियंता दिनाच्या निमित्ताने आयोजन; विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद






पुणे: राष्ट्रीय अभियंता दिनाच्या निमित्ताने येथील एमआयटी एमआयटी आर्ट, डिझाइन, आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) व राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या या सामाजिक आवाहनाला विद्यार्थ्यांनीही उदंड प्रतिसाद देल्याने या शिबिरातून तब्बल १५० रक्त पिशव्या संकलीत करण्यात आल्या.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन समारंभात विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.रामचंद्र पुजेरी यांच्या हस्ते तर डॉ. रजनीश कौर सचदेव बेदी, डॉ. विपुल दलाल, डॉ. वीरेंद्र शेटे, डॉ. सुदर्शन सानप, डॉ सूराज भोयर, एनसीसी समन्वयक मेजर सुमन कुमारी, एनएसएस समन्वयक प्रा.विशाल पाटील, प्रा. डॉ. हनुमंत पवार, प्रा. डॉ. सचिन पवार यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी, सर्व कार्यक्रम आधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.

यावेळी उपस्थित प्रत्येक मान्यवराने रक्तदानाचे महत्व विशद करताना, एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या सामाजिक उपक्रमाचे व विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधीलकीचे भरभरून कौतुक केले. एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष आणि कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करून महाविद्यालयीन जिवनात आपण समाजाचे काहीतरी देणं लागतो, हा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

# वाघोली येथे लवकरच सुरू होणार सिव्हिल हॉस्पीटल; रामभाऊ दाभाडे यांची माहिती

वाघोली : वाघोली येथील गायरान जमिन गट नं. ११११९ व ११२३ मधील एकुण ३.५ एकर जागेमध्ये सिव्हिल हॉस्पीटल व ट्रामा सेंटर सुरु करण्याची मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे यांनी राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती. आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे मार्गदर्शनाखाली शासन स्तरावर यासाठी सद्या प्रशासकीय स्तरावरील पाठपुरावा सुरू असून लवकरच हॉस्पीटल सुरू होणार असल्याची माहिती माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे यांनी दिली आहे.



याबाबत रामभाऊ दाभाडे यांनी सांगितले की ग्रामपंचायत वाघोलीने ग्रामसचिवालय बांधकामा साठी वाघोली येथील गायरान जमिन गट नं. १११९ व ११२३ मधील एकुण ३.५ एकर जागा महाराष्ट्र शासनाकडुन मुख्य कार्यराकी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचे नावे वर्ग करुन घेतली होती. परंतु वाघोली गावचा दिनांक ३०/०६/२०२१ रोजी पुणे महानगर पालिकेमध्ये समावेश झाला आहे. सदर जागेचा ७/१२ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे नावे असल्याने सदर जागा पुणे महानगर पालिकेकडे वर्ग झालेली नाही. वाघोली हे गाव पुणे-नगर रस्त्यावरील मुख्य गाव आहे. वाघोली गावाची आज रोजीची लोकसंख्या २ ते २.५ लाख इतकी आहे. तसेच वाघोली व पुणे शहराच्या पुर्व भागामध्ये २५ गावे आहेत. या गावामध्ये सर्व प्रकारच्या सोयी असणारे कोणतेही शासकीय मोठे रुग्णालय नाही त्यामुळे वाघोली पासुन लोणीकंद, शिक्रापुर, शिरुर ते नगरपर्यंत सर्व रुग्णांना उपचारासाठी पुणे येथील सिव्हिल हॉस्पीटल मध्ये जावे लागत आहे. या सर्व रुग्णांना पुण्यामध्ये जाणेसाठी वाघोली मधूनच जावे लागते.

परंतु दिवसेंदिवस वाघोली पासुन पुणे शहरामधील वाढत असणारी गर्दी व त्यामुळे होणारी वाहतुक कोंडीमुळे कित्येक रुग्णांना वेळेमध्ये उपचार मिळत नाही. वाघोली येथील मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचे मालकीची गायरान जमिन गट नं. १११९ व ११२३ मधील पुणे नगर रस्त्यावरील केसनंद फाटा या ठिकाणचे एकुण ३.५ एकर क्षेत्रामध्ये वाघोली व परिसरामधील लोकांसाठी सिव्हिल हॉस्पीटल व ट्रामा सेंटर सुरु केल्यास निश्चितपणे वाघोलीसह पुर्व भागामधील २५ गावे व नगर महामार्गाद्वारे पुण्यामध्ये येणा-या सर्वच रुग्णांसाठी याचा फायदा होणार असल्याचे दाभाडे यांनी सांगितले.

# खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीला स्थगिती!

**खेड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचंड तापलेल्या खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती पदाच्या निवडणुकीला काही तास शिल्लक असतानाच सहकार विभागाने स्थगिती दिली. तालुक्यातील विरोधकांनी एकत्र येऊन आमदार दिलीप मोहिते-पाटील यांचे दोन संचालक फोडून मोठा राजकीय डाव टाकण्याची योजना केली होती, परंतु थेट सहकार मंत्र्यांकडून निवडणुकीला स्थगिती मिळवत आमदारांनी विरोधकांवर कुरघोडी केल्याची चर्चा आता तालुक्यात चांगलीच रंगली आहे.




उत्तर पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजार समिती म्हणून खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचा उल्लेख होतो. यामुळेच बाजार समिती आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी सत्ताधाऱ्यांसह विरोधक नेहमीच प्रयत्न करतात. सभापती कैलास लिंभोरे आणि उपसभापती विठ्ठल वनघरे यांनी राजीनामे दिल्याने ही निवडणूक जाहीर झाली होती. दीड वर्षांपूर्वी बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक देखील प्रचंड चुरशीची झाली होती. त्यावेळी देखील आमदार दिलीप मोहिते-पाटील यांच्या विरोधात तालुक्यातील सर्व गट एकत्र आले होते, पण आमदारांनी १८ पैकी तब्बल ११ संचालक आपल्या गटाचे निवडून आणून गड शाबूत ठेवला होता. पण आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा तालुक्यातील सर्व गट एकत्र येत मोहिते-पाटील यांना सभापती पदाच्या निवडणुकीत खिंडीत पकडण्याचा डाव टाकला होता. आमदार दिलीप मोहिते-पाटील यांचे दोन संचालक विरोधकांनी फोडून थेट परदेशात घेऊन गेले होते. संचालकांचा संपर्कच होऊ न शकल्याने आमदारांनी निवडणुकीच्या आदल्यादिवशी उच्च पातळीवर सर्व सुत्रे हलवत थेट सहकार मंत्री आणि उच्च न्यायालयात जात निवडणुकीला काही तास शिल्लक असतानाच स्थगिती मिळवली.

# अपूर्ण शिक्षण पूर्ण करण्यासाठी परीक्षेची संधी

**पुणे । प्रतिनिधी**

पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण ठराविक मुदतीत पूर्ण करता आले नाही



अथवा त्यांचे एक अथवा दोन असे बॅकलॉग विषय राहिले आहेत, त्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी परीक्षेची संधी देण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे,

अशा विद्यार्थ्यांची संख्या सुमारे दहा हजारच्या आसपास आहे. या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी लिंक खुली करण्यात आली असून त्याची अंतिम मुदत दि. ५ ऑक्टोबरपर्यंत आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीनुसार विद्यार्थ्यांना ठराविक वर्षांत पदवी अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

त्या कालावधीत शिक्षण पूर्ण केले नाही तर पुन्हा पहिल्या वर्षांपासून शिक्षण घ्यावे लागते. एक अथवा दोन विषयांत अनुत्तीर्ण असल्याने पूर्ण पदवी घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी देण्यात आली. त्यांनी दोन परीक्षेत राहिलेल्या विषयांत उत्तीर्ण झाल्यास त्यांना पदवीचे शिक्षण पूर्ण करणे शक्य होणार आहे. २०१३ मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेतला आहे, त्यांना शिक्षण पूर्ण करता आले नाही. अशा सर्व विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी अर्ज करता येणार आहे. दिलेल्या मुदतीत अर्ज न करणे, विद्यार्थ्यांपर्यंत माहिती न पोहोचणे आदी कारणामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये, याची सर्व जबाबदारी संबंधित महाविद्यालय व शैक्षणिक संस्थांची राहील.

# बारामतीतील दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या घटनेत आणखी सात जणांची नावे

बारामती : दोन अल्पवयीन मुलींवर पुण्यात चौघांनी अत्याचार केलेल्या प्रकरणात संबंधित मुलींवर बारामतीतीलच आणखी सात जणांनी अत्याचार केल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. या दोन्ही मुलींनी तपासामध्ये अजून सात जणांची नावे घेतलेली असून आता या प्रकरणात या सातही जणांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात आता एकूण अकरा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.




पोलिसांनी नवीन पुरवणीमध्ये ओंकार भारती, ओम कांबळे, अप्पा शेंडे, अक्षय मडके, सूरज इंदलकर, संस्कार वाघमारे व श्रेणिक भंडारी (संपूर्ण नावे नाहीत) या सात जणांवर बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला असून या सातही जणांचा पोलिस शोध घेत आहेत.दोन अल्पवयीन मुलींना पळवून त्यांच्यावर पुण्यात अत्याचार केल्या प्रकरणी बारामती शहर पोलिसांनी या अगोदर ज्ञानेश्वर उर्फ ज्ञानेश भारत आटोळे. अनिकेत प्रमोद बेंगारे, यश उर्फ सोन्या शिवाजी आटोळे या चौघांवर गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी संबंधित मुलीकडे सखोल तपास केल्यानंतर या प्रकरणात आणखी काही जणांनी या मुलींवर या अगोदरच्या काळात अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. या मुलींच्या जबाबानुसार वरील सात जणांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.